Journal of Research & Development
Vol. 5 (Issue 05), September-October, 2015
(ISSN-2230-9578)

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या लैंगिक अभिवृत्तींचा तुलनात्मक अभ्यास

सुनिता शिवाजी म्हसदे
विद्यार्थी संशोधक

डॉ.गौरी विजय पाटील
अधिव्याख्याता, श्री.सुरुपसिंग हि-या नाईक
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर, जि.नंदूरबार

प्रस्तावना -

डॉ.सिग्मॅन्ड फ्राईड या शास्त्रज्ञाच्या मतानुसार बहुसंख्य मानसिक आाार आणि लैंगिक गुन्हे या मागे दडून राहिलेल्या सुप्त लैंगिक विकृतीच असतात. म्हणुनच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मनात उद्‌भवना-या प्रश्नांची त्यांना शास्त्रीय व सकारात्मकतेकडे 'घेवून जाणारी उत्तरे हवीत. लैंगिक शिक्षणाचा समावेश फक्त अभ्यासक्रमात करुन भागणार नाही तर पुढील पिढीची लैंगिक अभिवृत्ती कशी सकारात्मकतेकडे व समाजविधायक कामाकडे वळेल याचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. मानवी जीवनातील लैंगिक अभिवृत्ती महत्वाची भूमिका बाावते. अभिवृत्ती ह्या सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारच्या असतात. निकोप आणि समृध्द जीवन जगण्यासाठी विद्यार्थी दशेतच अभिवृत्तीचे मापन होणे व त्यातूनच सकारात्मक अभिवृत्तीची जोपासना व नकारात्मक अभिवृत्तीचा त्याग महत्वाचा ठरतो. काही लैंगिक अभिवृत्ती या कायमस्वरुपी राहतात तर काही बदलत राहतात. सद्याचे लैंगिक गुन्हेगारीचे वाढते प्रमाण लक्षात 'घेता लैंगिक अभिवृत्तीला आकार देण्यासाठी वैज्ञानिक माहिती व जीवनमूल्यांची शिकवण आवश्यक आहे. लैंगिकअभिवृत्ती ह्या व्यक्तीच्या आसपासच्या वातावरणाच्या परिणामातून जन्म 'घेतात.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचे लैंगिक अभिवृत्ती मापन अत्यंत आवश्यक आहे कारण माध्यमिक स्तरावरील लैंगिक शिक्षणाचे पाठ शिकवतांना शिक्षकांची लैंगिक अभिवृत्ती ही सकारात्मक, निरोगी व वैज्ञानिकतेकडे झुकणारी हवी. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विदयार्थ्यांची लैंगिक अभिवृत्तीचे मापन करुन सकारात्मक लैंगिक अभिवृत्ती वाढीस प्रयत्न करता येतील. त्यासाठी प्रस्तुत संशोधनातून लैंगिक अभिवृत्तीच्या खालील 10 'घटकांचे मापन केले आहे.

1. विवाहपूर्व लैंगिक संबंध	2. विवाहबाह्य लैंगिक संबंध	3. मासिक पाळी
4. हस्तमैथून	5. अश्लिल साहित्य	6. समलैंगिकता
7. बहुपत्नीत्व/बहुपतीत्व	8. गर्भपात	9. संतती नियमन साधने
10. एच.आय.व्ही./एड्स		

वाढत्या प्रसारमाध्यमांच्या विळख्यामुळे जग खूप जवळ आले आहे. त्यासाठी स्त्री पुरुष असा भेद न राहता मैत्रीभाव वाढीस लागणे आवश्यक आहे. मैत्रीपूर्ण संबंध, परस्परांचा आदर, प्रेम, सन्मान ह्या सर्व बाबींच्या वाढीसाठी विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालयीन दशेतच सकारात्मक लैंगिक अभिवृत्ती वाढीसंदर्भात प्रयत्न होणे आवश्यक आहे. आधुनिक जीवन शैलीच्या स्वीकाराबरोबरच मूल्यांची जपणूक देखील यशस्वी समाज बनविण्यासाठी आवश्यक आहे.

संशोधनाचे शीर्षक - शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या लैंगिक अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास.

संशोधनाची गरज -

1. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थी व विद्यार्थीनी भावी शिक्षक आहेत त्यांची लैंगिक अभिवृत्ती ज्ञात असणे आवश्यक आहे. माध्यमिक स्तरावर अभ्यासक्रमातील लैंगिक शिक्षणाचा पाठ शिकवताना त्यांची स्वत:ची अभिवृत्ती सकारात्मक असणे आवश्यक आहे.
2. विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन जीवनातील लैंगिक विचारांची अनिश्चितता दूर करण्यासाठी सदर संशोधन आवश्यक आहे.
3. नकारात्मक लैंगिक अभिवृत्तीची माहिती प्राप्त होण्यासाठी सदर संशोधन अत्यंत गरोचे आहे.

संशोधनाचे महत्व -

1. प्रस्तुत संशोधनातून शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थी व विद्यार्थीनी यांची लैंगिक अभिवृत्ती ज्ञात होईल.
2. सकारात्मक लैंगिक अभिवृत्ती वाढीसाठी प्रयत्न करता येतील.
3. प्रस्तुत संशोधनातून लैंगिक अभिवृत्तीच्या विविध 'घटकांबद्दल विद्यार्थ्यांचे मत प्रदर्शित होईल.
4. लैंगिक गुन्हेगारी रोखण्यासाठी लैंगिक अभिवृत्ती मापन उपयोगी ठरेल.

संशोधनाची उद्दिष्टये -

1. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या लैंगिक अभिवृत्तीचे मापन करणे.
2. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थीनींच्या लैंगिक अभिवृत्तीचे मापन करणे.
3. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि विद्यार्थीनी यांच्या लैंगिक अभिवृत्तीची तुलना करणे.

संशोधनाची परिकल्पना -

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि विद्यार्थीनी यांच्या लैंगिक अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांमध्ये सार्थ फरक नसतो.

संशोधनाची व्याप्ती -

1. प्रस्तुत संशोधन हे लैंगिक अभिवृत्ती या समाशास्त्रीय व मानसशास्त्रीय संकल्पनेशी निगडीत आहे.
2. प्रस्तुत संशोधनात वय वर्षे 18 पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या लैंगिक अभिवृत्तीचे मापन केले जाणार आहे.
3. प्रस्तुत संशोधनातून लैंगिक अभिवृत्तीच्या 10 'घटकांचा विचार केला जाणार आहे.
4. प्रस्तुत संशोधनात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थी व विद्यार्थीनींचा समावेश करण्यात आला आहे.

संशोधनाची मर्यादा -

1. प्रस्तुत संशोधन फक्त युवावस्थेतील विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादीत आहे.
2. प्रस्तुत संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणर्थी विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादीत आहे.
3. प्रस्तुत संशोधन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव अंतर्गत असणा-या शिक्षणशास्त्र महाविद्यालयापुरतेच मर्यादीत आहे.
4. प्रस्तुत संशोधन हे 2014 ते 2015 साठी प्रवेशित विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादीत आहे.

संशोधनाची जनसंख्या-

प्रस्तुत संशोधनासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव अंतर्गत येणारी शिक्षणशास्त्र महाविद्यालये ही जनसंख्या आहे.

नमुना निवड-

प्रस्तुत संशोधनासाठी चार शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची निवड लॉटरी पध्दतीने केली. संभाव्यता वर्गीकृत यादृच्छिक न्यादर्श पध्दतीने 100 विद्यार्थी व 100 विद्यार्थीनी यांची न्यादर्श म्हणुन निवड करण्यात आली.

संशोधनाची साधने -

प्रस्तुत संशोधनातून लैंगिक अभिवृत्तीचे मापन करण्यासाठी सुनिता शिवाजी म्हसदेयांनी डॉ.गौरी विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेली लैंगिक अभिवृत्ती मापिका वापरण्यात आली आहे. लैंगिक अभिवृत्तीच्या एकुण 10 'घटकांचे मापन ह्या लैंगिक अभिवृत्ती मापिकेतून होणार आहे. ही 70 विधानांची लिकर्ट तंत्रानुसार पंचबिंदूश्रेणी प्रतिसादासाठी बनविली आहे. प्रस्तुत मापिकेमध्ये अनुकूल व प्रतिकूल विधानांचा समावेश आहे.

संकलित माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ -

प्रस्तुत संशोधनातुन शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची लैंगिक अभिवृत्तीचे मापन करावयासाठी नमुना निवड करण्यात आलेल्या विविध शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांकडुन लैंगिक अभिवृत्ती मापिका भरुन माहिती संकलित केली. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी संख्याशास्त्रीय परिमाणांची मदत 'घेतली.

परिवर्तक	न्यादर्श	मध्यमान	प्रमाणविचलन	T मूल्य
विद्यार्थीनी	100	267.28	28.30	3.4
विद्यार्थी	100	253.92	27.15	



आलेख क्र.1



आलेख क्र.2

संकलित माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ लावण्यासाठी संख्याशास्त्रीय परिमाणांद्वारे विश्लेषण करुन अन्वयार्थ लावला. तो अन्वयार्थ दोन प्रकारे पुढीलप्रमाणे

1. संशोधकाने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केले. त्या माहितीच्या आधारे वर्णनात्मक सांख्यिकीचा उपयोग करुन अन्वयार्थ लावला. त्यासाठी लैंगिक अभिवृत्तीचे मापन करुन मध्यमान व प्रमाणविचलन या परिमाणांचा उपयोग केला.

2. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या लैंगिक अभिवृत्तीमध्ये फरक असतो.

शिफारशी-

महाविद्यालयीन जीवनात वाढणारी लैंगिक गुन्हेगारी लक्षात 'घेता खालील शिफारशी मोलाच्या ठरतात.

1. विद्यार्थ्यांच्या सकारात्मक अभिवृत्ती वाढीसाठी सर्व स्तरातून एकत्रितपणे प्रयत्न करावेत.
2. मोबाईल वापराची विधायक पध्दतीने शिस्त लावावी.
3. लैंगिक शिक्षणाची सुरुवात माध्यमिक शाळांमधून करावी.
4. विद्यार्थ्यांमध्ये निकोप व निर्व्यसनी वृत्ती, मैत्रीभाव जागृती व वाढीस हातभार लावावा.

संदर्भ सुची -

1. गोडबोले मंगला व खानविलकर वैायंती (2012), वयात येताना, पुणे राजहंस प्रकाशन
2. घाटे निरांन (2013), प्रेम, स्पर्श आणि आकर्षण, पुणे मनोविकास प्रकाशन
3. चैतन्य,मुक्ता (2012), तेरा ते तेविस, पुणे: समकालीन प्रकाशन.
4. नाडकर्णी सुरेश(2003), मुलगा वयात येतो, मुंबई, पॉपुलर प्रकाशन
5. प्रभू विठ्ठल : लैंगिक शिक्षण, राजहंस प्रकाशन पुणे, 2010
6. पंडीत, बन्सी बिहारी (2007) शिक्षणातील संशोधन (संख्यात्मक व गुणात्मक), पुणे : नित्यनुतन प्रकाशन.
7. बर्वे, बी.एन. (2008), मनोमापन, नागपुर : विदया प्रकाशन.
8. बर्वे, बी.एन. (2010). मानसशास्त्रातील संशोधन पध्दती, नागपुर : विद्या प्रकाशन.
9. भितांडे, वि.रा. (2008) शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे : नुतन प्रकाशन.
10. मुळे, रा.शं. उमाठे, वि.तु. (1987). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपुर : महाराष्ट्र विद्यापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ.
11. Chavan S.S. (2007). Advanced Education Psychology, New Delhi: Vikas Publishing House Pvt.Ltd.
12. Creswell, J. W. (2013) Educational Research, Fourth Edition, Delhi : PHI Learning Private Limited.
13. Garrett, H.E. (2014) Statistics in Psychology & Education, Delhi: Surjeet Publications.
14. Kothari, C.R. and (2014), Research Methodology – Methods & techniques Gard, Gaourav. Third Editor, New Delhi : New Age International (P) Limited, Publishers.
15. Maio, G.R, Haddock, G. (2009) The Psychology of Attitudes & Attitude Change, New Delhi: Sage Publications.

Journal of Research & Development
Vol. 5 (Issue 05), September-October, 2015
(ISSN-2230-9578)

महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प एक दृष्टीक्षेप

डॉ. एस. पी. जाधव
पदव्युत्तर वाणिज्य विभाग प्रमुख
आर. ए. आर्टस, श्री. एम. के. कॉमर्स & श्री. एस. आर. राठी सायन्स कॉलेज वाशिम, ता. जि. वाशिम
प्रा. ए. जी. वानखडे (संशोधक)
(व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
श्री. बाबासाहेब धाबेकर कला व वाणिज्य महाविद्यालय रिसोड ता. रिसोड जि. वाशिम

पाणी हा सर्व सजीव सृष्टीच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. किंबहुना पाण्याविना जीवन नाही. कारण मानवाला लागणारे अन्न हे पाण्याशिवाय तयार होऊ शकत नाही. म्हणून कृषी उत्पादनासाठी पाणी हा महत्वाचा घटक आहे. त्यामूळे शेतीमधील उत्पादन वाढीसाठी हा घटक महत्वाचा असल्यामूळे कृषी शास्त्रातील गतीमान घटक म्हणून ओळखल्या जातो. कृषीची जलसिंचनाची गरज हा घटक भागवित असल्यामूळे या घटकात गतिमान घटक म्हणून संबोधले जाते. पाण्याची उपलब्धता ही पर्जन्यावर अवलंबून असल्यामूळे व अलिकडच्या काळात पर्जन्यमानात दिवसेंदिवस घट होत असल्यामूळे व पर्जन्यमानाच्या लहरीपणामूळे कृत्रिम पाणी पुरवठयाचे साधन म्हणून जलसिंचन प्रकल्पाना मोठया प्रमाणावर महत्व प्राप्त झाले आहे. म्हणून सिंचन सुविधांकडे लक्ष देणे हे शासनाचे महत्वाचे व प्रथम कर्तव्य ठरते. भारताचे माजी पंतप्रधान स्व. पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी भाक्रा नांगल धरणाचे उदघाटन करतांना पाटबंधारे प्रकल्प आधूनिक भारताचे तिर्थ क्षेत्र आहे, असे उदगार काढले होते. यामध्ये प्रकल्पांचे महत्व सामावले आहे. नॅशनल ग्रीड योजनांची माहिती संयूक्त राष्ट्रपरिषदेकडे मार्गदर्शनासाठी पाठविली असता यूनोने त्यावर आपले मत प्रदर्शित करतांना भारतात २,००० पर्यंत भीषण पाणी टंचाई निर्माण होईल असे मत व्यक्त केले होते. यावरून देशात सिंचनाचे महत्व अधोरेखीत होते. म्हणूनच जलसिंचन हा शासनाच्या व समाजाच्या दृष्टीने महत्वाचा व जिव्हाळ्याचा विषय बनला आहे.

तसेच आंतरराष्ट्रीय विधी संघटनेने १९९२ मध्ये पाण्याच्या क्षेत्रीय वाटा ठरविण्यासाठी मार्गदशन तत्व सूचविली आहेत. भारतीय संविधानानूसार पाणी हा घटक राष्ट्रीय संपत्ती जाहीर करण्यात आला आहे. म्हणून शासकिय स्तरावरून पाणी या घटकाचे जतन व संवर्धन व्हावे म्हणून शासकिय स्तरावरून विविध धोरणे आखली जात आहेत त्याचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

शासकिय धोरण म्हणजे शासनाने विशिष्ट परिस्थितीत समाजाच्या कल्याणाचे धोरण आखले आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी शासकिय परिपत्राकाव्दारे, शासन निर्णयाव्दारे आदेश देणे होय.

आज देशातील सर्व राज्यातील जल प्रकल्प आणि विशेषता: सिंचनप्रकल्प संक्रमण कालखंडातून जात आहेत महाराष्ट्र देखील याला अपवाद नाही. सिंचन विकास योजना बध्द करण्यासाठी गेल्या पाच वर्षात राज्याने महत्वाच्या सुधारणा घडवून आणल्या व त्या राष्ट्रीय जलनितीशी सबंधीत आहेत.

महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प :

पाणी वापर संस्थाना सिंचन व्यवस्थापन हस्तांतरण करण्यापूर्वी वितरण प्रणालीची पुर्न:स्थापना व नूतनीकरण करण्याचे प्रस्तावीत आहे. प्रकल्पाची देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी मोठया प्रमाणावर निधीची आवश्यकता असल्याने महाराष्ट्र शासनाने जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प हाती घेण्याचे ठरविले आहे. याबाबतचा ठराव केंद्र शासनाच्या अर्थ खात्यामार्फत जागतिक बँकेस सादर केला होता. जागतिक बँकेस या प्रकल्पास ३२५ दशलक्ष डॉलर इतके (रू.१,५३५) कोटी अर्थ सहाय्य कर्ज रूपाने देण्यास मंजूरी दिली आहे. प्रकल्पाचा करार अंदाजीत ऑगष्ट २००५ मध्ये करण्यात आला आहे.

प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत रू.१,८६० कोटी आहे. प्रकल्पाची अंमलबाावणी २० सप्टें, २००५ पासून सुरू करण्यात आली असून प्रकल्प कालावधी ६ वर्षाचा (३० सष्टेंबर २०११ पर्यंत आहे.)

पाणी वापर संस्थाच्या कार्यक्षम सहभागाने सिंचन व्यवस्थापन अधिक कार्यक्षम समन्यायी शाश्वत व परिणामकारक करण्याच्या दृष्टीने तसेच राज्यातील पूर्ण झालेल्या निवडक प्रकल्पांची देखभाल दुरूस्ती याबाबतचा खर्च भागविता यावा यासाठी महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाचा प्रस्ताव जागतिक बँकेकडे सादर केला होता. महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाच्या २००१ सालच्या प्रस्तावात २६ लाख हेक्टर सिंचन क्षमतेचे २,२४३ पूर्ण झालेले पाटबंधारे प्रकल्प समाविष्ट आहेत. प्रकल्पावर होणारा अंदाजीत खर्च मोठा असल्याने हा प्रकल्प दोन किंवा तीन टप्प्यात राबविण्याचे प्रस्तावित आहे. पहिल्या टप्प्यात सुमारे १,८६० कोटी रू. आर्थिक मर्यादीत ६,७०,००० हेक्टर लागवडी योग्य क्षेत्रातील प्रकल्प घेण्यात आले आहेत. पाणी वापर संस्थेतर्फे फक्त त्यांच्या कार्यक्षेत्रात. करण्यात येणाऱ्या स्थापन कामाकरीता रू.५०० प्रतिहेक्टर (रू.२०० प्रतिहेक्टर) रोख व रू. ३०० प्रतिहेक्टर रोख किंवा मजूरी च्या स्वरूपात इतक्या खर्चाच्या मर्यादेत सहभाग समाविष्ट आहे.

जल क्षेत्रात सुधार प्रकल्पांतर्गत समाविष्ट होणारे घटक :

(अ) पाणी वापर संस्थाची स्थापना

(ब) लाभधारकांच्या सहभागाने वितरण व्यवस्थेचे पूनर्वसन व आधूनिकीकरणाची कामे

(क) धरण सुरक्षा कामे

(ड) कृषी विषयक सहाय्यभूत सूविधा

(ई) भू-जल व्यवस्थापन पथदर्शक प्रकल्प

(फ) संस्थात्मक सुधारणा व क्षमता सूधारणा

(ग) एकात्मिक संगणीय माहिती पध्दती

(ह) प्रकल्प व्यवस्थापन

(इ) कंत्राट व्यवस्थापन समिती

वरील सर्व घटक हे जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत समाविष्ट झालेले आहेत त्यात पाणी वापर संस्थाची सहकारी तत्त्वावर मोठया प्रमाणात स्थापना करण्यात येत असून त्यांच्या मार्फत पाणी व्यवस्थापनाचे कार्य सुरळीतपणे सुरु आहे. म्हणजेच पाणी वापर संस्थांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे.

जल सुधार प्रकल्पाचे फायदे:

प्रकल्प पूर्णत्वानंतर ६.७० लाख हेक्टर लाभक्षेत्र असणाऱ्या सध्याच्या २३६ याजेनांतर्गत अधिक चांगल्या सिंचन सुविधा निर्माण होऊन शिर्ष तसेच पृष्ठ भागातील शेतकऱ्यांमध्ये पाण्याचे समान वाटप होण्याची खात्री निर्माण होईल. प्रकल्पाचे बांधकाम पुनर्वसन विषयक उपाय योजनांमूळे पाण्याची बचत होऊन अंदाजे १ लाख हेक्टर एवढी सिंचन क्षेत्रात वाढ अपेक्षित आहे. यामूळे कृषी उत्पादनात दरवर्षी साधारण सात दशलक्ष टन वाढ होईल.

प्रकल्पांची सद्यस्थिती :

(अ) या प्रकल्पांची अंमलबाावणी २९ सप्टेबंर २००५ पासून सुरू झाली असून मार्च २०१० अखेर रू ७१४.४३ कोटी इतका खर्च झालेला आहे. २००९-१० या वित्तीय वर्षासाठीचा नियतव्यय रू. ३२४.३९ कोटी इतका आहे. सन २०१०-११ या वित्तीय वर्षा साठीचा नियतव्यय रू ५०० कोटी इतका आहे.

(ब) प्रकल्पांतर्गत आतापर्यंत झालेली लक्ष्यपूर्ती :

१. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण स्थापन करण्यात आले असून त्याचे कामकाज पूर्ण सुरू झाले आहे.

२. एकूण स्थापन करावयाच्या १,३५४ पाणी वापर संस्थापैकी १,३४० पाणी वापर संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत.

३. प्रकल्पातील ७६% प्रापण (रू. १,२०० कोटी) पूर्ण करण्यात आले आहे. प्रकल्पातील उर्वरीत १५ प्रतिशत प्रापण सप्टें २०१०

पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

४. आज पर्यत रू. ५१५.८८ कोटी प्रतिपूर्ती योग्य रकमेची ३९ प्रतिपूर्ती देयके सादर करण्यात आली असून रू. ४७४.४९ कोटी प्रतिपूर्ती रक्कम जागतिक बॅकेकडून राज्य शासनास देण्यात आली आहे.

५. प्रकल्पांतर्गत संनियंत्रण व मूल्यांकनासाठी माहिती प्रशिक्षण व प्रसारासाठी एकात्मिक संगणकिय माहिती प्रणालीसाठी इ.सर्व महत्वाच्या सल्लागार यंत्रणा नेमण्यात आल्या असून त्याचे कामकाज सूरू आहे.

६. प्रकल्प अंमलबजावणी सूरू झाल्यापासून प्रकल्पाचा प्रगतीचा आढावा घेण्यासाठी जागतीक बँकेकडील चार सुपरविजन मिशन महाराष्ट्रात येवून गेली व त्यांनी आपल्या अहवालात महाराष्ट्राला सर्वसाधारण प्रकल्प अंमलबाावणी बाबत समाधानकारक शेरा दिलेला आहे. फेबूवारी मार्च २००९ मध्ये मध्यावधी आढावा मिशन आलेले होते. या मिशन मध्ये दिलेल्या अहवालानूसार उर्वरीत घटकांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सारांश :

जलसुधार प्रकल्पांतर्गत पाणी वापर संस्थांची स्थापना, लाभधारकांच्या सहभागाचे वितरण, व्यवस्थेचे पुनर्वसन व आधुनिकीकरणाची कामे, धरण सुरक्षा कामे, कृषी विषयक सहाय्यभुत सुविधा, भुजलव्यवस्थापन पथदर्शक प्रकल्प, संस्थात्मक सुधारणा व क्षमता सुधारणा, एकात्मीक संगणीय माहिती पध्दती, प्रकल्प व्यवस्थापन, कंत्राट व्यवस्थापन समिती इ. घटकांचा समावेश होत असून त्यामध्ये पाणी वापर संस्थांची भुमिका अत्यंत महत्वाची आहे. प्रकल्प पुर्णत्वानंतर ६.७० लाख हेक्टर लाभक्षेत्र असणाऱ्या सद्याच्या २३६ योजनांतर्गत अधिक चांगल्या सिंचन सुविधा निर्माण होऊन शिर्ष तसेच पृष्ठभागातील पाण्याचे शेतकऱ्यांमध्ये समान वाटप होण्याची खात्री निर्माण होईल. तसेच कृषी उत्पादनात दरवर्षी साधारणत: सात दशलक्ष वाढ होईल.

संदर्भ :

१. राज्यातील सिंचनाची प्रगती व वाटचाल (श्वेतपत्रिका खंड - १) जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई

२. सिंचन स्थितीदर्शक अहवाल, महाराष्ट्र राय २०१०

३. महाराष्ट्र ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा - डॉ. जहागिरदार दि. व्य.

Journal of Research & Development
Vol. 5 (Issue 05), September-October, 2015
(ISSN-2230-9578)

भुसावळ येथे आयोजित पूर्वखानदेश जिल्हा परिषद अधिवेशन -१९१९

प्रा.दिनेश रामदास महाजन,
इतिहास विभाग प्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद ता.यावल जि. जळगाव (महाराष्ट्र)

महात्मा गांधीजी भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर येण्यापूर्वी लोकमान्य टिळकांनी सर्व प्रांतात, प्रांतिक व जिल्हा परिषदा भरविण्याचे आणि त्याद्वारे लोकजागृतीचे कार्य चालविले होते. या परिषदांच्या माध्यमातून स्थानिक प्रश्न, प्रादेशिक तसेच राष्ट्रीय प्रश्नांवर मंथन होऊन त्यातून समाजपयोगी ठराव पास करुन ते सरकारकडे पाठविलेले दिसून येतात.या ठरावांना सरकारचा प्रतिसाद फारसा उत्साहवर्धक नसला तरी किमान त्या प्रश्नांवर लोकजागृती होण्यास मदत होत असे.तसेच जिल्हयातील जनतेत व कार्यकर्त्यांमध्ये या परिषदांच्या माध्यमातून संघटन घडवून त्या समस्या सोडविण्यासाठी जनतेनेच ठोस कार्यक्रम हाती घेतलेले दिसून येतात.

पूर्वखानदेश जिल्हयात अशीच एक जिल्हा परिषद भुसावळ येथे १८ व १९ मार्च १९१९ रोजी पार पडली.परिषदेकरिता भुसावळच्या उत्साही कार्यकर्त्यांनी दुष्काळ, अधिकारी मंडळींचा विरोध आणि इतर स्थानिक परिस्थितीस न जुमानता उत्कृष्ठ तयारी केली होती. परिषदेचे अध्यक्ष पंढरीनाथ काशिनाथ तेलंग हे दि.१८ मार्च रोजी सकाळी कलकत्ता मेलने भुसावळ येथे येणार असल्याने रेल्वे स्टेशनवर त्यांचे स्वागत करण्याकरिता भुसावळचे प्रमुख पुढारी अण्णासाहेब वासुदेव विठ्ठल दास्ताने, गोपाळराव गोगटे, हरि पाटणकर वकिल हजर होते. अध्यक्ष पंढरीनाथ तेलंग व जळगाव, चाळीसगाव व पाचोरे येथील प्रतिनिधी याच गाडीने भुसावळ येथे दाखल झाले.अध्यक्ष पंढरीनाथ तेलंग यांना भुसावळवासीयांतर्फे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.त्यानंतर घोडा गाडीत बसवून त्यांना त्यांच्या मुक्कामाची व्यवस्था असलेल्या बंगल्यावर पोहोचविण्यात आले.

त्याचबरोबर परिषदेला वेगवेगळया ठिकाणांहून अनेक वरिष्ठ नेते आले होते.त्यात प्रामुख्याने रा.ब.चिंतामण वैद्य, कल्याण, आणि नामदार उपासनी व जावडेकर वकील, धुळे यांचा समावेश होता. ही पाहुणे मंडळी परिषदेसाठी आपला अमुल्य वेळ देऊन आली अशी भावना आयोजकांची होती.परिषदेसंबंधी प्रबोधचंद्रिकेचा वार्ताहर नमुद की, स्वयंसेवकांची प्रतिनिधींशी अत्यंत नम्र वागणूक, कोणतेही काम व्यवस्थित व झटपट करण्याची तत्परता पाहून फारच आनंद वाटला.

भुसावळ येथे प्रतिनिधींना राहण्यासाठी एक विस्तृत धर्मशाळा सुशोभित केली होती.विविध तालुक्यातून जवळपास १२५ प्रतिनिधी व भुसावळतील कार्यकर्ते व स्वागत मंडळाचे सभासद मिळून ही संख्या जवळावळ ३५० पर्यत गेली होती. परिषदेकरिता एक विस्तृत मंडप अतिशय सुंदर पध्दतीने सजविलेला होता. उच्चासनावर सुमारे दिडशे स्वागत मंडळीच्या सभासदांची सोय केली होती.तसेच परिषदेच्या कामकाजास ९ वा.`वंदे मातरम्`,.`शिवाजी महाराज कि जय`, `अध्यक्ष महाराज कि जय`, `लोकमान्य टिळक महाराज कि जय` अशा गजरांत व उत्सावर्धक टाळयांच्या निनादात सुरुवात झाली.

स्वागत मंडळाचे नियोजित अध्यक्ष श्रीयुत वाड हे आजारी असल्यामुळे औषोधपचाराकरिता मुंबईस गेले होते.त्यांचे काम भुसावळचे उत्साही व प्रसिध्द वकिल हरी पाटणकर यांनी केले.स्वागत मंडळाचे अध्यक्ष वाड यांचे भाषण गोगटे वकिल यांनी वाचुन दाखविले. यात त्यांनी ` खानदेशची ऐतिहासिक काळापासून राजकीय व आर्थिक बाबतीत स्थिती उत्तम रीतीने वर्णन करुन सद्यस्थितीत हिंदुस्थानातील बहूजनसमाजाप्रमाणे खानदेशातील लोकसंख्या मुख्यत्वे शेतीवरच कशी अवलंबून आहे, इतर धंदे जवळावळ नामशेषच असून दुष्काळ इन्फयुएंझा वगैरे चालू वर्षाच्या आपत्तीमुळे खानदेशची स्थिती कशी आहे याचे सप्रमाण विवेचन त्यांनी आपल्या भाषणात केले होते. प्रतिनिधी बांधव, पाहुणे व प्रेक्षक यांचे मन:पूर्वक स्वागत केल्यावर परिषदेचे अध्यक्ष श्रीयुत तेलंग यांची अध्यक्षपदावर निवड करावी असा पहिला ठराव महाजनी वगैरे यांनी आणला. त्यास जळगावतर्फे कोल्हटकर वकिल व यावलतर्फे महाजनी वगैरेनी अनुमोदन व पुष्टी दिल्यावर अध्यक्ष निवडणूकीचा ठराव टाळयांच्या गजरात पास होऊन तेलंग अध्यक्षस्थानापन्न झाले.

श्रीयुत तेलंग यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीस अध्यक्षपदाचा मान दिल्याबद्दल स्वागत मंडळाचे आभार मानले. नुकतेच

संपलेले पहिले महायुध्द या सिध्दांताच्या प्रस्थापनेसाठी चालले होते तो सिध्दांत कोणता याचे मार्मिक विवेचन प्रो.जाक्स, प्रो.विल्सन, प्रो.बेटस एच.जी., वेल्स वगैरे लोकांच्या लेखावरुन व भाषणांवरुन व ते लेख व भाषणे यावरुन निघालेल्या निष्कर्षावरुन केले. ॲटॉक्रसी समूळ नाहीशी व्हावी व या ठिकाणी ॲटॉक्रसीचा सुपरिणाम दिसत होता त्या ठिकाणीच तिचा पराभव व्हावा हा महायुध्दाचा उद्देश होता. प्रो.जेक्स असे म्हणतात कि, युरोपियन राष्ट्रांना मेक्यानिझम आणि डायाबोलाझम असे दोन रोग लागले होते. सदरचे रोग युरोपीयन राष्ट्रातील अहमहमिका कळसास पोचविण्यात कारण झाले.रागद्वेषादि मनोवृत्ती, वेदांतादि साधनांनी आणि साहित्यादि शास्त्रांच्या अभ्यासाने योग्य मर्यादेत ठेवाव्या.संपत्तीच्या अनिवार इच्छेचा विरोध करावा,१ असा पौवार्त्य शास्त्रज्ञानाचा रोख होता. परंतु युरोपीयन शास्त्रज्ञानाचा रोख कला व हुन्नर यांचे निरनिराळे शोध लावून लढाईच्या शस्त्रास्त्रांची समृध्दी अद्भुत शोधाच्या साहयाने करुन इतर ठिकाणची संपत्ती आपणाकडे ओढावी हा मेकनिझमचा अर्थ आहे. अशा तऱ्हेची संपत्ती मिळवत असतांना कला हुन्नर विषयक जे ज्ञान ते संपत्ती वाटेल त्या साधनांचा उपयोग करुन मिळविण्याकरिता उपयोगात आणावे.चांगल्याच रितीचा सन्मार्गाचा अवलंब करावा, असे नाही हा डायबोलिझमचा अर्थ आहे.युध्दारंभी लहान लहान राष्ट्राच्या स्वातंत्र्य रक्षणाकरिता असे दोस्त राष्ट्रे म्हणत होती व प्रेसिडेंटविल्सन सुध्दा स्वायत्तता व स्वसंमती या तत्वांचा पुरस्कार करण्याकरिताच आपण महायुध्दात पडलो असे म्हणतात. परंतु हे उद्देश सर्वस्वीच सत्य होते असे म्हणता येत नाही. प्रो.बेटस यांनी तर संपत्तीची हाव, मुलूख व व्यापार वाढविण्याची उत्सुकता हीच याचे मुळाशी आहेत.असे म्हटले आहे.उदा.प्रेसिडेंट विल्सन यांनी जे १४ मुद्दे तहाकरिता सादर केले होते. त्यातील `फ्रीडम ऑफ ध सीज` `समुद्रावरील स्वातंत्र्य` ही गोष्ट अवश्यच आहे असा आता निर्णय आहे. महायुध्दाचा विचाराकरिता शास्त्रीय शोधांची अभिवृध्दी आणि लढाईच्या शस्त्रास्त्रांची अमर्याद सुधारणा यासच हल्लीचे युध्दाबद्दल जबाबदार धरले पाहिजे असे प्रो.वेल्स यांचे म्हणणे आहे. ते कसेही असले तरी युध्दारंभीचे उद्देश हल्ली विसरले गेले आहेत व जास्तीत जास्त मुलूख मिळविण्याबद्दल युरोपीयनराष्ट्रात चढाओढ चालु आहे असे स्पष्ट म्हणण्यास हरकत नाही. शांतता परिषदमध्ये `लीग ऑफ नेशन्स` राष्ट्रसंघाच्या कल्पनेचा पुरस्कार केला जात आहे या राष्ट्रसंघात आज फक्त गोरी राष्ट्रेच असून त्यामध्ये कोणत्या राष्ट्राची जास्त भर घालावयाची हे गोऱ्या राष्ट्रांनीच ठरवावयाचे आहे. नाही म्हणावयास एक जपानचा अंतर्भाव राष्ट्रसंघात करण्यात आला आहे. वारा कोणत्या दिशेने वाहत आहे याचा एकंदरीत विचार केल्यावर प्रे.विल्सन हे आज मितीस अल्पसंख्याक वर्गात असून त्यांच्या तत्वांचा काहीही परिणाम शांतता परिषदेवर होईल असे दिसत नाही. महायुध्दात पुकारलेले उद्देश व तत्वे स्वयंनिर्णयांचे तत्व बाजूसच राहून फुकट जातील व पुन्हा येरे माझ्या मागल्या या म्हणीप्रमाणे युरोपातील मोठमोठी राष्ट्रे युध्दा पूर्वीच्याच स्थितीत कायम राहण्याचा प्रयत्न करुन मुलूख आणि संपत्ती याची हाव कमी करणार नाहीत असा स्पष्ट रंग दिसतो`.

पुढे अध्यक्ष तेलंग म्हणाले, `आता या सर्व युरोपियन राजकारणाचा हिदुस्थानावर काय परिणाम होणार याचा थोडा विचार करु. युध्दारंभी लॉर्ड हार्डिज व्हाइसराय असतांना त्यांनी (India is bled white) असे उद्‌गार काढले होते. त्या उद्‌गाराची आठवण देऊन तेलंग यांनी हिंदुस्थानने महायुध्दाकरिता द्रवबळ व मनुष्य बळ देऊन राजनिष्ठा कशी व्यक्त केली तिचे सुरस वर्णन केले.व ६७ कोटीची देणगी महायुध्दाप्रित्यर्थ पुन्हा हिंदुस्थानवर कशी लादली आहे.`एक्सेस प्रॉफिटस टॅक्स` त्यामुळे कसा बसवावा लागला सदरची ६७.५० कोटीची देणगी अयोग्य असून तिचा परिणाम उद्योगधद्यांच्या वाढीस कसा विघातक होईल याचे विवेचन केले.लष्करावर खर्च, रेल्वेवर खर्च असे अनेक खर्च हिंदुस्थानच्या तिजोरीतून चालले असतांना शिक्षणाकरिता सरकारपाशी पैसा नाही ही गोष्ट किती शोचनिय आहे, हे विशद करुन सांगितले.गेल्या मुंबई कौन्सिलचे बैठकित शिक्षण खात्यावर खर्चासंबंधी जे धोरण दिसले आहे. त्याचे सर्व श्रेय ना.रहिमतुल्ला यांना आहे व पूर्वी सार्वजनिक चळवळीत पडलेला मनुष्य जबाबदारीच्या जागेवर आला तर तो कशी सुधारणा करु शकेल याचे हे एक उदाहरण आहे असे त्यांनी सांगितले. जी गोष्ट पैसे नाहीत म्हणून करता येत नाही असे सरकारतर्फे सांगण्यात येते तीच गोष्ट कळकळीचा लोकनियुक्त पुढारी कार्यक्षमपणे कौन्सीलात करु शकतो. हा धडा सरकारने घ्यावा` असे तेलंग यांनी बजाविले.

रौलेट बिलासंबंधी उल्लेख करतांना कौन्सिलातील ना.व्हाईसरायचे आरंभीचे भाषणाचा उल्लेख करुन तेलंग म्हणाले,` युध्द संपल्यानंतर हिंदुस्थानचे राजकीय वातावरण विरुध्द दिशेने फरक होत चालला आहे.युध्द संपण्यापूर्वी राजकिय सुधारणासंबंधाचा रिपोर्ट प्रसिध्द झाला व लोकांना काही तरी राजकीय हक्क पदरात पडणार याची उत्सुकता उत्पन्न झाली.परंतु युध्दानंतर राजकीय सुधारणा संबंधी उदासिनताच दिसून येत असून १७.५० कोटीची देणगी दिली जाऊन आपल्या पदरात रौलेट बिलेच पडली यावर काय निष्पन्न होते.

महायुध्दाच्या शेवट होऊन युरोपातील बोल्शेव्हिक चळवळ हिंदुस्थानात कदाचित येऊन पडेल या सबबीवर रौलेट बिल तोंडावर टाकणे म्हणजे महायुध्दाचा शेवट झाला ही आमच्या नुकसानाची गोष्ट आहे. सन १९०६ साली दादाभाई नौरोजी यांनी स्वराज्याची मागणी केल्यानंतर राष्ट्रीय सभेत मागण्यांची प्रगती कशी होत गेली आहे याचा विचार करुन हल्ली सुधारणास आधारभूत असलेल्या १९१७ चा पार्लमेंट मधील मॉटेंग्यु यांनी जाहीर केलेला सरकाराचा उद्देश हिंदुस्थानास जबाबदार राज्यपध्दती देण्याचा आहे असे सांगितले. याप्रमाणे हल्लीचा सुधारणेचा मसुदा केला असून सदरचा मसूदा असमाधारणकारक आहे, असे तेलंग यांनी सांगितले.

सदरचा सुधारणांचा विचार करण्याकरिता मुंबई येथे भरलेल्या काँग्रेसमध्ये तडजोडीचे म्हणून या सभेने जे धोरण स्विकारले त्या धोरणाचा पुरस्कार तेलग यांनी केला.२

सभेत विविध विषयांवर सांगोपांग चर्चा होऊन एकमताने महत्वाचे ३३ ठराव पास करण्यात आले.

पूर्व खानदेश जिल्हा परिषदेत पास झालेले ठराव :-

१ आपल्या राजेसाहेबास अपूर्व विजयप्राप्ती व्हावी याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

२ दोस्त राष्ट्राच्या सैन्याने व विशेषत: हिंदी सैन्याने आपल्या अतूल पराक्रमाने जर्मनीची दृष्ट महत्वाकांक्षा रसातळास नेली सबब ही सभा उभय सैन्याचे अभिनंदन करुन आदरबुध्दी व्यक्त करीत आहे.

३ राजपूत्र प्रिन्स ऑफ जॉन हे अकाली मरण पावले याबद्दल ही सभा बादशहाचे सांत्वन करीत आहे.

४ डॉ. हरी कृष्णदेव, प्रो.हरीभाऊ देव, कादंबरीकार हरीभाऊ आपटे, एरंडोलचे बालकवी ठोंबरे, जळगावचे डॉ.शंकरराव चोपडेकर, चाळीसगावचे आसारिया देवानंद धर्मसिंह व एरंडोलचे पेन्शनर मास्तर आठवले यांच्या निधनामुळे या सभेस अत्यंत खेद वाटत आहे.

५ सर एस.पी.सिंह यास अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेटचे जागी नेमिले व त्यास पिअर केले याबद्दल या सभेस समाधान वाटत आहे.व सर सिंह यांनी पॅरिसच्या परिषदेत हिंदुस्थारनची मागणी प्रस्थापित करावी अशी ही सभा त्यास आग्रहाची विनंती करीत आहे.

६ लोकमान्य टिळक, महात्मा गांधी व जस्टीस हसन हमाम यास राष्ट्रीय सभेने शांतता परिषदेकरिता प्रतिनिधी निवडले असून त्यास त्या सभेत अंतर्भूत करुन घेतले नाही याबद्दल या सभेस खेद होत आहे.

७ स्वराज्य, हिंदी लोकांची स्वराज्य मिळविण्याची पात्रता, डेक्केरेशन ऑफ राईटस्, मुद्रणस्वातंत्र्य, स्वसंमती तत्व इंडियन सिव्हिल सर्विसमध्ये हिंदू लोकांचे शेकडा प्रमाण व साडेसदुसष्ट कोटीचा लढाईचा बोज या संबंधाने दिल्लीच्या राष्ट्रीय सभेने जे ठराव पास केले व आ.इ.मॉ.लीगने जे ठराव पास केले त्या त्या ठरावास या सभेची पूर्ण मान्यता आहे.

८ या जिल्हयात या अस्पृश्य मानलेल्या जाती आहेत त्यास शिक्षण द्यावे व आरोग्य बुध्दिचे मार्ग दाखवावे तसेच त्यांची सामाजिक योग्यता वाढवावी अशी या सभेची सर्व लोकांना व सार्वानिक संस्थास विनंती आहे.

९ लोकमान्य टिळक, बॅ. बापटिस्टा, दादासाहेब करंदीकर वगैरे स्वयंशासन पध्दतीकरीता जे श्रम घेत आहेत त्याबद्दल ही सभा त्याचे आभार मानीत आहे. या मंडळीस व काँग्रेस व मुस्लिम लिग यांच्या डेप्युटेशन खर्चाकरिता सर्वांनी द्रव्य सहाय्य द्यावे अशी ही सभा विनंती करीत आहे.

१० हल्लीच्या अपूर्व विजय प्रसंगी राजकीय गुन्हेगार व भारतसंरक्षक कायद्याचे आधाराने अटकेत असलेले लोक यांच्यावर सरकारने दया करुन त्यास बंधमुक्त करावे अशी या सभेची सरकारास विनंती आहे.

११ कुळकर्णी लोकांची वतने खालसा करण्याच्या कामी सरकारकडून अन्याय झाला आहे सबब सरकारने ती वतने पूर्ववत चालू करावी असे या सभेचे मत आहे.३

१२ या जिल्हयातील म्युन्सिपालिटयांची सांपत्तिक स्थिती शोचनीय आहे.सबब प्राथमिक शिक्षणाकडे आपले उत्पन्नापैकी १/४ पेक्षा जास्त रक्कम म्युन्सिपालिटयांवर पडू नये.बाकीची तूट सरकाराने सोसावी तसेच प्राथमिक शाळेतील शिक्षकास मिळणारी वॉर अलाउन्सची रक्कम सरकाराने सोसावी.

१३ धान्याच्या बाबती सरकारने जी फुड कंट्रोल पध्दती चालू केली आहे ती फायदेशीर नाही सबब ती बंद करावी.व धान्य खरेदीस रेल्वेकडून मालाच्या डब्यांचा पुरवठा होत नाही सबब तो पुरवठा होण्यास रेल्वेसे हुकूम सोडावे.

१४ मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाकरिता सरकारने २/३ बोज सोसावा व म्युन्सिपालिटया व लोकल बोर्ड यांची ग्रँट त्या प्रमाणे वाढवावी व म्युन्सिपालिटयानींही वरील शिक्षण लौकर अमलांत आणावे.

१५ आमची राजनिष्ठा ध्यानी आणून हत्याराचा कायदा रद्द करावा.तसेच लष्करी खात्यात हिंदी सैनिकास या जागा दिल्या आहेत त्या आणखी मोठया प्रमाणात द्याव्या व इं.डि.फोर्समध्ये हिंदी विद्यार्थ्यांस लष्करी शिक्षण मोठया प्रमाणावर द्यावे.

१६ हल्लीच्या महागाईच्या प्रसंगी सरकारने स्वस्त धान्याची दुकाने जरुर काढावी तसेच धनिक लोकांनी व म्युन्सिपालिटयांनीही हया कामी मदत करावी.एरंडोल म्युन्सिपालिटीने धान्याच्या दुकानाकरिता सरकारावळ ॲडव्हान्स रक्कम मागितली ती अद्याप मिळाली नाही तरी सरकारानी ती ताबडतोब द्यावी.

१७ अवर्षणामुळे या तालुक्यास साऱ्याची तहकूबी मिळाली आहे त्या तालुक्यात कित्येक खातेदारांकडून पूर्वीच सारा सरकार जमा झाला आहे तो त्यास परत करण्यात यावा व यंदाचा तहकूबी सारा माफ व्हावा अशी विनंती आहे. दोन हप्त्यांनी काळीचा वसूल घेण्याची सवड कायद्याने आहे परंतु अलिकडे सगळा सारा वसूल होतो ही वहिवाट सरकारने बंद करावी अशी विनंती आहे.

१८ रेल्वेने उतारुंच्या गाडया कमी केल्याने उतारुंचे हाल व नुकसान होते. सबब गाडयांचा पुरवठा योग्य प्रमाणात व्हावा व वाढलेले तिकिटांचे दर पुर्वीप्रमाणे व्हावे.ॲग्लो इंडियन व युरोपीयन यांच्यासाठी डबे राखुन ठेवण्याची जी पध्दत आहे ती अजिबात बंद करावी अशी विनंती आहे.

१९ कुरणांच्या लिलावाच्या पध्दतीत गवताच्या गाडीचे दर व गवताच्या पासाचे दर नक्की करुन लिलाव करावे अशी सरकारास शिफारस आहे. डोईगवत आणण्याकरिता पासाचे दर फारच भारी आहेत ते दरसाल प्रमाणे कमी करण्यात यावे अशी विनंती आहे.

२० हल्लीच्या दुष्काळाप्रसंगी गायरान मोकळे करणे, गुरास पाण्याचा पुरवठा करणे, जंगलातील ओली लाकडे तोडण्याची लोकांना परवानगी देणे, सरपण व काठयांचे पास फुकट देणे, बिनव्याजी शेतकऱ्यास तगाई देणे, गुराकरिता चाऱ्याचा पुरवठा ठिकठिकाणी करणे, साथीच्या वेळी औषधे फुकटमिळणे, गावालगत दुष्काळी कामे चालु करणे, वगैरे कामाकडे सरकारने जरुर लक्ष द्यावे अशी विनंती आहे.

२१ रानटी जनावरांपासून बचाव होण्याकरिता लोकांस हत्यारांचे कायमचे परवाने सरकारने द्यावे.

२२ लोकांच्या तरणोपायाकरिता विस्तृत औद्योगिक व धंदे शिक्षण देण्याची सरकार लौकर व तजवीत करुन धंदे शिक्षणाची शाळा काढील व हया जिल्हयाची औद्योगिक पहाणीकरुन लोकांचा धंद्यात शिरकाव करुन देईल अशी सरकारास विनंती आहे.

२३ रौलेट बिलाच्या योगाने आमच्या हक्कावर व स्वातंत्र्यावर गदा येत आहे म्हणून हा जुलमी कायदा सरकाराने एकदम बंद करावा असे हया सभेचे म्हणणे आहे.

२४ चोपडे, अमळनेर,पारोळा येथे नवीन सर्वे करुन जी जरब वाढ झाली आहे ती कमी करुन व एरंडोल तालुक्यात होणारी नवीन वाढ दुष्काळामुळे तहकुब ठेवावी अशी सरकारास विनंती आहे.

२५ खेडयातील लोकांना वैद्यकिय मदत वेळेवर व्हावी म्हणून पंधरा हजार वस्तीस एक दवाखाना मध्यवर्ती ठिकाणी जरुर स्थापन करावा व म्युन्सिपालिटयांनी आर्युवेर्दिक दवाखाने चालु करावे असे सभेचे मत आहे.

२६ ज्ञानहिनलोकांना सरकारने ऑनररी मॅगिस्ट्रेट नेमिते ही पध्दत अनिष्ट आहे.सबब कायद्याने ज्ञानी असलेल्या लोकांना ऑनररी मॅगिस्ट्रेट नेमावे अशी सभेची विनंती आहे.

२७ या जिल्हयात सिटी म्युन्सिपालिटीत व नो.फा.एरिया कमेटित सरकारी लोक चिफ ऑफीसर नेमिले आहे तसे यापुढे नेमण्यात येऊ नये व जे नेमिले आहेत त्यास सरकारने परत घ्यावे असे सभेचे मत आहे.

२८ जळगावास डिस्ट्रीक्ट व सेशन कोर्ट लौकर व्हावे, रावेर, जामनेर, पाचोरे, चोपडे येथे स्वतंत्र अगर फिरती कोर्ट व्हावी, निदान रावेर तालुका भुसावळ कोर्टास जोडावा, व पारोळे तालुक्यातील काही गावे एरंडोलकोर्टातून काढून अमळनेर कोर्टास जोरदार पूर्ववत एरंडोल कोर्टास जोडावे असे मागणे आहे.

२९ इमारतीच्या एका दगडाच्या गाडीची फी १९१३ पासून ३ आणे करण्यात आली आहे ती ५ आणे करावी.

३०पूर्वखानदेश जिल्हा सभेने सार्वजनिक कार्यसिध्दीकरीता एक फंड जमविण्याचा उपक्रम चालू केला त्या फंडास सर्वांनी अवश्य द्रव्य

द्यावे अशी सभेची विनंती आहे.

३१ हया जिल्हयात प्रत्येक गावात ग्रामपंचायती स्थापन कराव्या, आरोग्य, शिक्षण, हलके गुन्हे व दावे यांचा निकाल करण्याचा अधिकार त्या ग्रामपंचायतीस असावा व ही कामे चालविण्याचा खर्च गांवाच्या उत्पन्नातून ठरवून द्यावा असे सरकारापाशी सभेचे मागणे आहे.४

३२ हायर व मिडल स्कूलची फी पूर्वी इतकी तरी करावी अशी विनती आहे.

३३ पूर्वजिल्हा सभेच्या घटनेकरिता नियमांचा मसूदा तयार करुन तो पुढील परिषदेत सादर करावा.व हे काम करण्याकरिता पुढील गृहस्थ कमिटीत दाखल करावे.

१ गोगटे वकील, भुसावळ

२ भागवत वकील, चाळीसगाव

३ जोशी वकील, एरंडोल

४ अभ्यंकर वकील, जळगाव

५ देवकी वकील, यावल

६-७ जिल्हा परिषदेचे २ सेक्रेटरी ५

निष्कर्ष :- भुसावळ येथे आयोजित जिल्हा परिषदेत खानदेशच्या सद्यस्थितीवर विशेषत: दुष्काळ व एन्फयुएंझा या सारख्या नैसर्गिक आपत्तीवर चर्चा करण्यात येऊन दुष्काळ पिडीतांना सरकारने विविध मदत करावी. तसेच ब्रिटीश सरकार शस्त्रास्त्रे व लष्करावर प्रचंड खर्च करीत असतांना शिक्षणाबाबत मात्र अनास्था दाखवत असल्याची टिका परिषदेत करण्यात आली.तसेच परिषदेत ब्रिटीशांना पहिल्या महायुध्दात यश मिळाल्याबद्दल शुभेच्छाही व्यक्त करण्यात आल्या. तर खानदेशातील विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तींचे निधन झाल्याबद्दल शोक व्यक्त करण्यात आला. तसेच यापुढे तरी भारतीयांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, तसेच अस्पृश्य वर्गापर्यंतही विविध सोयी सुविधा पुरवाव्यात, प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे. तसेच शिक्षणाकरीता किमान २/३ बोझा सरकारने सहन करावा, भारतीयांची राजनिष्ठा लक्षात घेऊन हिंदी सैंनिकांना लष्करात मानाच्या जागा द्याव्यात, रेल्वे गाडया वाढवाव्यात, तिकिट कमी करावे, युरोपीयन व अँग्लो इंडियन लोकांसाठी असलेली स्वतंत्र डब्यांची पध्दत बंद करावी अशा विविध मागण्या परिषदेत ठरावांच्या रुपाने मांडलेल्या दिसून येतात. एकुण या परिषदेत ब्रिटीश शासनाशी राजनिष्ठा व्यक्त करुन विविध सुधारणा मिळवून घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

संदर्भ साधने :-

१ सा.प्रबोधचंद्रिका, जळगाव, ३१ मार्च १९१९, पृ.०१

२ सा.प्रबोधचंद्रिका, जळगाव, ३१ मार्च १९१९, पृ.०२

३ सा.प्रबोधचंद्रिका, जळगाव, ७ एप्रिल १९१९, पृ.०१

४ सा.प्रबोधचंद्रिका, जळगाव, ७ एप्रिल १९१९, पृ.०२

५ सा.प्रबोधचंद्रिका, जळगाव, ७ एप्रिल १९१९, पृ.०३

Journal of Research & Development
Vol. 5 (Issue 05), September-October, 2015
(ISSN-2230-9578)

लोकसंस्कृती आणि लोकगीते लोकसाहित्यातील सांस्कृतिक विविधता

प्रा.डॉ. आशालता पांडूरंग महाजन
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन
महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे, ता. यावल, जि. जळगांव

लोकसाहित्यातून लोकजीवनाचा आविष्कार होत असतो आणि लोकसाहित्यातील प्रेरणानुसार लोकजीवन 'घडत असते.लोकजीवनाची जीवन जगण्याची पध्दती, लोकजीवनातील आचार-विचार, विधी आणि लोकसंस्कृती इत्यादींचे प्रतिबिंब लोकसाहित्यात पडलेले पाहावयास मिळते.लोकजीवनाच्या विविध भावात्मक रंगछटाही लोकसाहित्यात पाहावयास मिळतात.लोकजीवनातील काही आचार-विचार, प्रथा लोकसाहित्यातून व्यक्त होतांना दिसतात. लेकजीवनातील विविध जाती-जमातीतील विधींनाही लोकसाहित्यात अत्यंत महत्त्व आहे. विधी आणि लोकगीते यांचा जवळचा संबंध आहे. मानवी जीवनातील सुखदुःखाच्या भावना, धीर, गंभीर प्रसंग आणि मानवी स्वभावाच्या विविध छटा आपणास लोकसाहित्यात पाहावयास मिळून लोकसंस्कृतीचे दर्शनही आपणास त्यातून घडते. हे लोक म्हणजे एका वेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा एक वर्ग आहे.वेगळे जीवन जगणारा व या जीवनाचा सर्वसामान्य लोकांवर ठसा उमटविणारा हा वर्ग आहे.या संस्कृतीचे दर्शन आपल्याला या वर्गातून घडते ती संस्कृती स्वाभाविकपणे जगत असते, विकसित होत असते आणि बदलत्या जीवनाचे संस्कार घेऊन वाटचाल करीत असते. तसेच मानवी जीवनाचे त्या जीवनाच्या विशेषांचे जुने अवशेष या संस्कृतीत आपल्याला पहावयास मिळतात. माणसांच्या जीवनविषयक सवयीतून, रुढीतून, परंपरेतून, आचार-विचारातून आविष्कृत होत असतात. आणि याच संस्कृतीचे, लोकजीवनाचे दर्शन आपणास लोकसाहित्यातून घडत असते.

लोकसाहित्याची शाब्दपरंपरा ही बहुदा मौखिक परंपरा असते.लोकगीते, लोककथा, म्हणी, वाक्प्रचार, उखाणे-अहाणे, लोकप्रचलित मंत्र या सर्वांना आपण शाब्द लोकसाहित्य असे म्हणतो.लोकगीते व लोककथा हे शाब्द लोकसाहित्याचे सर्वात समृध्द दालन आहे.माझ्या शोधनिबंधातून लोकगीतातील, सांकृतिक विविधतेचे संदर्भ तपासून पाहण्याचा मी प्रयत्न करणार आहे.लोकगीते लोकजीवनातूनच आविष्कृत होत असल्याने त्या त्या लोकभाषेचा प्रभाव त्या त्या लोकगीतावर पडलेला पाहावयास मिळतो.लोकगीते लोकसमूहाच्या बोलीतच असतात.बोली मौखिक असल्यामुळे तिच्यात आपल्याला चैतन्य दिसते.नेहमी वापरात असलेले व लोकजीवनातून साकार झालेले अर्थपूर्ण शब्द लोकगीतात गोडवा व आत्मियता निर्माण करतात.लोकसाहित्यात परंपरेने चालत आलेल्या विधींचा, रुढींचा समावेश असल्यामुळे व त्यातील काही विधींना धर्मविधीचे स्वरुप असल्यामुळे व्यक्तीच्या जीवनात पर्यायाने लोकीवनात विधींचे महत्त्वाचे स्थान असते.या विधींचा व रुढींचा समाजजीवनावर बराच पगडा असल्यामुळे हे विधी पार पाडतांना करण्यात येणारे विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम यांनाही लोकसाहित्यात महत्त्व येते.या रुढी, प्रथा आणि विधी यामुळे त्या त्या प्रांतातील, त्या त्या जमातीच्या संस्कृतीची ओळख आपल्याला लोकसाहित्याच्याद्वारा होते. लोकसाहित्यातील लोकगीते, लोककथा, लोकनृत्य आणि लोकसंगती यांच्या अभ्यासाने भारतीयांची मूळ संस्कृती आणि आचार-विचार यांच्यावर प्रकाश टाकता येतो.भारतीय प्राचीन संस्कृतीचे दर्शन आदिवासींच्या लोकसाहित्यातून आणि मराठी लोकसंस्कृतीचे दर्शन मराठी लोकसाहित्यातून होते.लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या लोकसंस्कृतीविषयी पं. प्रयागदत्ताी शुक्ल पुढील उद्गार काढतात -

"किसी भी जाति की सभ्यता और संस्कृती का परिचय हमे उसके काव्य, गीत और चित्रकला में मिलता है। कला के अंतर्गत लोकगीत, लोकनृत्य और लोककहानीयाँ भी आती है, और उनके जातीय गुणधर्मोका पता चलता है।

लोकजीवन की सामूहीक चेतना, उसकी आशा-निराशा, हर्ष-विषाद, आशाए, स्वप्न और संघर्ष की मार्मिक अभिव्यांना का चित्रण हमे लोकसाहित्य से मिलता है..... वे अज्ञात है और अज्ञातही रहेंगे। यह वह भावना है - जो प्राकृतिक जीवन की सहगामिनी है और उसी का नाम 'संस्कृती' है।" पं.प्रयागदत्ताी शुक्ल यांच्या वरील उद्‌गारावरून लोकसाहित्य आणि संस्कृती यांचा किती जवळचा संबंध असतो हे स्पष्ट होते.

मराठी लोकगीते -

मराठी लोकसाहित्यात पद्य विभागामध्ये ओव्या, गीते, खेळांची गाणी, उखाणे इ.प्रकार येतात.यांची आवड प्रामुख्याने स्त्रियांमध्ये आढळते.विविध प्रसंगी, उदा. जात्यावर बसून दळण दळत असतांना. तसेच झोपाळ्यावर बसून झोके घेत असतांना स्त्रीया या ओव्या गातात त्यातून त्यांच्या समाुती, चालीरीती, वैयक्तिक सुखदुःखे आणि एकुणच स्त्रीीवनातील अनेक बारकावे यांचे प्रभावी दर्शन होते. ओव्यांचा फार मोठा भाग कौटुंबिक ओव्यांनी सालेला असून त्यातून सासर-माहेर याबद्दलचा जिव्हाळा व्यक्त झाला आहे.

उदा. पिवळा पितांबर मला पुशितो सारा गाव
पिता दौलत राांस म्या ग लुटीला बाजीराव
माडीवर ग माडी सये सासर मामाजींची
उभी राहून पहाते मी लंका तिथून म्हायाराची

अशा हौसेमौौच्या गोष्टी करणाऱ्या ओव्यांबरोबरच मातृप्रेम, बंधुप्रेम, जातकुळीचा अभिमान, देवावरील भक्ती इ. भावनांचा आविष्कारही ओव्यांतून प्रभावीपणे प्रकट झाला आहे.तसेच चैत्रगौरी, नागपंचमी, गर्भाधान, डोहाळे यांच्या निमित्ताने झोपाळ्यावरील गाणी म्हणण्याची प्रथा आाही महाराष्ट्रात आहे.केवळ पुरुषांनी जोपासलेला असा एक ओव्यांचा प्रकार म्हणजे धनगरी ओव्या.त्यांचे दोन प्रकार आहेत.धनगर आपल्या शेळ्या रात्री शेतात बसवतात त्यावेळी या ओव्या म्हणतात तो एक प्रकार व दुसरा प्रकार म्हणो मल्हारी-मार्तंड, मंगाई अशा देवदेवतांसंबंधीच्या ओव्या. जत्रेच्या वेळी दैवतांना जागृत करण्यासाठी ह्या ओव्या म्हटल्या जातात. तसेच शेतकऱ्यांची विहीरीच्या मोटेवरील सामुदायिक गीते, देवावरचा भक्तीभाव व्यक्त करणारी गीते, श्रीकृष्णाची गाणी लोकगीतात भरपूर प्रमाणात आहे.शिवाय नाविक गीते, कोळ्या-माळ्यांची गीते इ.रचनाही आढळतात.लोकगीतांमध्ये मानवी मनाचे ऋणानुबंध जिव्हाळ्याने गुंफलेले आढळतात.मराठी लोकसाहित्यात जन्म, विवाह, मृत्यू यासंबंधीही गीते आहेत. जन्मासंबंधीची गीते डोहाळ्यांपासून अंगाई गीतापर्यंतच्या अनेक अवस्थांतरांचे चित्रण करतात. स्त्रीगीतांमध्ये स्त्री वेदनेची कळ किती खोल आहे आणि तिचा परिसर किती व्यापक आहे.ह्याची कल्पना गीतांतून येते.काही गीतांमधून जगण्या-मरण्याचा तात्त्विक विचारही येऊन जातो.एकूणच भारतीय समाज कृषीप्रधान आहे.अशा समाजातील जीवन कुटुंबकेंद्री असते.ह्या व्यवस्थेतील श्रध्दांची आणि संकेतांची अनेक रुपे मराठी स्त्रीगीतांतून दिसतात.

आदिवासी लोकगीते

निसर्गाचे सान्निध्य असल्यामुळे पक्ष्यांचे कुजन, पानांची सळसळ, पाखरांचा गुंजारव, मेघांचा गडगडाट, प्राण्यांचे गुरगुरणे, पाण्याचा खळखळाट अशा सर्व गोष्टीतील नाद, लय, ताल आदिवासींच्या भाषेच्या उच्चारणावर परिणाम करीत असतो. साहित्य निर्मितीचे विशेष अशाच नैसर्गिक पर्यावरणातील प्रेरणेतून स्फुरलेले असतात.सामाजिक बांधिलकी हे त्याचे अविभाज्य अंग. समूह मनाशी त्याचे अतूट नाते असते.उत्सुकता, आश्चर्य, आनंद, भीती, प्रेम, आदर या सर्व भावना यातून आविष्कृत होतात.त्याची अनुभूती जशी सामाजिक असते तसेच त्याचे आविष्करणही सामाजिक असते.लयबध्दता आणि गेयता सहजसुंदर असते.वारंवार गाण्यामुळे गीत मुखांतरित होते. होळी, दसरा, दिवाळी या सण-उत्सवांना तर नृत्यगीते असतातच परंतु जन्म, मृत्यू, विवाह प्रसंगीची गीतेदेखील मार्मिक असतात. विवाहप्रसंगी नवऱ्या मुलाची थट्टा करणारी, नवऱ्या मुलीला चिडवणारी, विहिणी-विहीणीची गंमत करणारी सुरेख

भावसुलभ गीते तर नववधूची माहेराहून सासरी पाठवणी करणारी करुणरसपूर्ण गीते माडिया, बंजारा, कोरकू, परधान या सर्व जमातीत आहेत. शृंगारिक, प्रणयरसपूर्ण गीतेही नाचली जातात.अध्यात्मिक गीतांबरोबरच विकासाच्या प्रक्रीयेशी ओळख झाल्यावर, शाळा, निवडणूका, शिक्षण, डॉक्टर इ.विषयांवर सुध्दा लोकगीते आढळतात.

भारतीय संस्कृतीत नारीरुपात आढळणाऱ्या सर्व हळूवार भावना आदिवासी स्त्रीमध्ये प्रकर्षाने आढळतात.'नारी-मायेचे रुप ते अनंत, हौस नटण्याची तिला जन्माात' हे ह्या स्त्रीमध्ये प्रगट दिसते.फुले, मणी, रंगबिरंगी माळा, चांदीचे दागिने, अलीकडे प्लॅस्टिकची लाल, पिवळी वेणी तीचे सौंदर्य खुलविते. आदिवासी युवतीच्या विवाहासाठी जेव्हा मातापित्याचे विचार सुरू होतात. तेव्हा ती गीताच्या स्वरुपात आपल्या आवडी, इच्छा, संभ्रम प्रगट करते. गोंड युवती म्हणते -

वऱ्हाड देशनेसी मावा नावे दाऊमा।
जोरांग नोरा परोने नावे दाऊमा।।

(मला वऱ्हाडात देऊ नका मला वारी दळता येत नाही असे प्रत्येक प्रदेशाचे वैशिष्ट्य ती सांगते व गीत म्हणते.)

आम्मे पिला कांडकाद।
लक्ष्मी आणि दुर्गादेवी लांग कांडकाद।
हुश्यार ते हुश्यार गिनी ओव्वोल।

(आमची मुलगी दुर्गादेवीसारखी असून हुशार व कामात पुढे आहे.) विवाहाच्या प्रसंगीही स्त्रीच्या भावभावना प्रगट होतात.व त्यातून आदिवासी स्त्रीयांच्या जीवनाची झलक दिसते.

वधुमूल्य आदिवासी जीवनातील एक प्रस्थापित संस्था असून तिच्यात वर-वधूच्या वडिलांना धान्य, पशु, रुपये इ.देतो.त्याशिवाय मुलगी मिळत नाही.प्रेमविवाहात सुध्दा हे वधुमूल्य द्यावेच लागते.

माडिया नवरदेवाला मुलीच्या मैत्रीणी म्हणतात -

जोडी जोडी इनदादी।
वंजी वाल वाल दादी वंजी वाल वाल।।

(हे नवरदेवदादा (दादी) धान टाक आणि मग नवरीला ने, नवरी फुकट मिळत नाही.)

आपल्या हुंड्याच्या पध्दतीला विरुध्द अशी ही प्रथा आधुनिक युवतीला आदिवासी युवतीचा हेवा वाटावा अशीच आहे.

माहेरची ओढ सर्वच स्त्रियांना असते. डांग आदिवासी स्त्री गीतातून म्हणते -

दिवाळीचा थाट ना, आई पाहील वाटान।
राया माहेरी जाऊ द्या ना राया हो।।

तर माहेरच्या मीठ भाकरीची आठवण काढीत कातकरी स्त्री म्हणते

मायेरी जासी काय गो भारो खासी।
देवा भाव माझे गरीब रे दुबळे।।
देवा खाईन मी कुंड्याची भाकरी।
ये बाय गो भावा मायेरी।।

कोरकुंच्या एका लोकगीतात बाळाला अंगाई गातांना म्हटले आहे.

सोने का झुला झुलाया।
आँख का दिया, हाथ का पलना।।

और गोदी की पालकी।

झूला झूलाया।।

हे अंगाई गीत आदिवासी स्त्रीची ममता दर्शविते.

आदिवासी लोकगीतांमधून स्त्रीच्या जीवनाचे होणारे दर्शन अत्यंत मोहक पण भारदस्त स्वरुपाचे आहे.आपल्या तथाकथित प्रगत संस्कृतीत व त्यांच्यात आंतरिक साम्य असून आदिवासी स्त्रीीवन सरस आणि श्रेष्ठ दिसते.

आदिवासींची अलौकिकतेवर नितांत श्रध्दा आहे. अनाकलनीय अशा नैसर्गीक चमत्कारांच्या पुढे ते नितांत भक्तीभावाने विनम्र होतात.यातूनच निसर्गपूजेची निर्मिती झाली असावी.सूर्य, चंद्र, तारे, आकाश, पृथ्वी, जल-धारा, पाऊस, वायु, अग्नी इ. उपयुक्त पण अद्‌भुत, प्रसंगी रौद्ररुप धारण करणाऱ्या शक्तीची पूजाही त्यांच्या सणावारांची केंद्रबिंदू ठरते. नैसर्गिक वातावरणात त्यांचे सणवार त्यांच्या अनोळख्या रितीरिवांचे मनोहारी दर्शन आपणास घडवितात.

मेळघाटाच्या पहाडी जंगलात राहणारी कोरकू जमात, भवई- रांडभावे, चिकला भावे, दसरा, होळी हे त्यांचे महत्त्वाचे सण. भवईचा सण शेतकऱ्यांचा.या सणानंतर ते पेरणी सुरू करतात.वैशाख अमावस्येचा हा सण म्हणून ह्याला 'वैशाखी' पण म्हणतात.मृग नक्षत्र लागण्यापूर्वी हा सण करतात आणि उबडहंडीच्या कपड्याचे किती थर ओले झाले यावरून किती व कसा पाऊस येईल ह्याचा अंदाा घेतात.खेडा देवाला कोंबडी बळी देतात.खिचडीचा नैवद्य असतो.सण म्हटला की, नाचणं, दारुपिणं आलंच.

कोरकूंचा जिरोतीचा सण श्रावणात येतो तो पौर्णिमेला साारा करतात.आपल्या रक्षाबंधनसारखा हा सण भाऊ बहिणीला माहेरी घेऊन येतो. झाडांना झोके बांधलेले असतात. झोक्यावर झुलत झुलत बहीणी अत्यंत उत्साहाने भावा-बहीणीच्या प्रेमाची गाणी म्हणत असतात. या गीतांना डोलार गीते असेही म्हटले जाते.

इतर आधुनिकांच्या संपर्कात येऊन बहुतांश गोंडबांधव आपली गोंडीबोली व परंपरागत सणवारांपासून दुर गेले असले तरी अरण्यात राहणारी माडिया गोंड ही जमात आपल्या सांस्कृतिक वैभवाची जपणूक करते आहे. गोंडाचा दसरा म्हणजे विजयादशमी हा महत्त्वाचा सण अहेरी या गावी साजरा होतो. अहेरीच्या गावसीमेवळ नदी किनारी एक टेकडी आहे. तिथे परंपरागत देवता व मुंड आहे.या देवतेची, शमीच्या झाडाची व शस्त्राची पूजा करतात.वाजत गाजत पालखीतून मिरवणूक निघते.स्त्री-पुरूष, मुले-मुली गाणी म्हणत असतात.मागील दहा-बारा वर्षापासून एक वैशिष्ट्यपूर्ण बदल म्हणजे श्रीसाईबाबाची पालखी सुध्दा भजनाच्या गजरात निघते.गावातील भजनी मंडळी टाळ, मृदंगाच्या गजरात रस्त्याने फिरतात. मागे गोंड स्त्री-पुरूषही असतात.ही श्रीसाईबाबाची पालखी या दसऱ्याच्या सणाला एक नवीन आयाम व सांस्कृतिक समन्वयाची किनार लावते आहे असे वाटते.

कोरकू देखील दसऱ्याचा सण करतात.त्याचे स्वरूप मात्र अगदी वेगळे असते.कोरकू रावणभक्त आहेत.दसऱ्याला ते मेघनाद व कुंभकर्णाची पूजा करतात.नाचगाणी वाद्यांची साथ आणि दारुची नशा ह्यांनी रात्र जागते.या विधीमुळे कुंभकर्णाला जाग येते व तो संतुष्ट राहतो अशी कल्पना आहे.दिवसा हेल्याची मिरवणूक काढून रात्री त्याला कापून त्याचा प्रसाद वाटतात.होळीचा सण सर्वच आदिवासी जमातीत मोठ्या आनंदाने साजरा करतात.शिमगा, फाग ही त्यांची नावे.माडिया गोंड तर पुर्वापार सतत अग्नी घरात ठेवणारी व रात्री पेटत्या लाकडांच्या भोवती नाचणारी आणि त्याच प्रकाशात जीवन जगणारी जमात आहे.आता मात्र लाकडांची ही होळी दूर्मिळ होत चालली आहे.मात्र सणाच्या वेळी ती धूमधडाक्याने पेटते.रात्रभर होळीच्या भोवताली नाचतात.ताडी किंवा महुआ घेतलेली असते.परंपरागत वाद्ये ढोल, पागई यांच्या तालावर पदन्यास होतात.शृंगारिक गाण्याची त्याला साथ असते.

कोलाम पोडाबाहेर होळी पेटवितात.होळीपाशीच देवीची स्थापना करतात.रात्री कबड्डी, खो-खो, आट्यापाट्याचे खेळ करतात.शिमग्याची शिकारही करतात.एका जागी जमवून शिकारीची मेजवानी करतात.

परधान पाच दिवस होळीचा सण करतात.त्यांच्यासाठी हा जणू महोत्सवच असतो. यासाठी वर्गणी सुध्दा

गोळा करतात. लाकडे, कंदमुळे, फळे यांच्या बरोबर दारू व तंबाखू पण लागतोच. अंगण स्वच्छ सारवून देवीची पूजा करतात.पूजेमधे राळ, कापूर, बेल घेवून होळीची पूजा करतात व होळी पेटवितात.ढोलाच्या तालावर रात्रभर नृत्य व गाणी चालतात. गाण्यांमधून होळीसाठी नृत्यांचे निमंत्रणही देतात.दुसऱ्या दिवशी रंगपंचमी साजरी करतात.

कोरकूंचा होळीचा सण महिनाभर चालतो.प्रत्येक खेड्यात मुखीयाच्या हाताने होळी पेटवितात.मुठवा देवीची पूजा करतात.दारू पिऊन तर्र झालेले कोरकू हातात काठ्या घेवून घुंगरांच्या, ढोल, टिमकीच्या तालावर बेभान होवून नाचतात.देवदेवतांची व स्त्रीयांची वर्णने असलेली गंमत, विनोद करणारी गाणी म्हणतात. आदिवासींच्या सर्व सण-उत्सवात स्त्रीयांचा वाटा असला तरी काही सणवार हे प्रामुख्याने स्त्रीयांचे असतात. पश्चिम महाराष्ट्रातील महादेव कोळी जमातीत धानाची रोवणी झाल्यानंतर श्रमपरिहारासाठी स्त्रिया आणि मुलींचे खेळ आणि नृत्यगाणी सुरू होतात.ही नृत्ये फक्त स्त्रियांचीच असतात.वारली जमातीचा 'कोलीभाजी' सण पावरा जमातीत 'भोंगऱ्या' हा तरुणींचा सण तर बंजारा जमातीचा 'काजळतीज' सण. हा कुमारिकांचा सण आहे.हा सण हरतालिकेच्या पूजेसारखा वाटतो.

सांस्कृतिकदृष्ट्याही लोकगीतांचा ठेवा हा अमोल असतो.निरक्षरतेमुळे जनसमूहामधे सांस्कृतिक वारसा हा मौखिक परंपरेने जतन करण्यात येतो व पुढच्या पिढीकडे जातो.सामाजिक परिवर्तन होत असतांना लोकगीतांचे विषय, आशय आणि आविष्कार बदलत जातात.

सारांश

एकाच प्रकारची सांस्कृतिक जडण-घडण झालेला मानवसमूह म्हणजे 'लोक'. जसे भारतातील प्रत्येक प्रांतातील लोकांचे पोषाख, भाषा, अन्न हे वेगवेगळे असले तरी आपण सर्वजण सांस्कृतिकदृष्ट्या एकाच परिवारातले लोक आहोत. संस्कृतीची सर्व जडण-घडण समूहमनाच्या प्रेरणेने झालेली असते.रोजचे आचरण आणि संस्कृती त्यात कालमानानुसार होणारे बदल, कृषीप्रधान देश असल्यामुळे जमिनीला 'आई' मानणे, अनेक रुढी, समजूती व श्रध्दा कृषीप्रधानतेशी संबंधीत आहे.निसर्गाबद्दलची कृतज्ञता, आदर, निसर्गतत्त्वांना दिलेले देवतांचे रुप त्यातून निर्माण झालेल्या विविध चालीरीती यालाच आपण संस्कृती म्हणतो. जीवनात असलेले प्रतिकांचे महात्म्य, लोकीवनातून वलोकाचारातून घडलेला लोकधर्म, उत्सवांचे महत्त्व त्यातून गावोगावच्या जत्रा-यात्रा होत असतात. या जत्रांमध्ये पारंपारिकते बरोबरच शहरी भागात आधुनिक प्रकारचे उत्सव सुरू झाले आहेत.हे उत्सव धार्मिक असले तरी त्यांचे स्वरुप लोकोत्सवांचेच आहे. आदिवासींचा परिचय आता शिक्षणा बरोबरच मोठ्या शहरांशी होऊ लागला आहे. त्यामुळे सामाजिक बदल मोठ्याप्रमाणावर झालेला दिसून येतो.व त्याचे प्रतिबिंब विविध प्रकारे त्यांचे राहणीमान, वेशभूषा, भाषा एकंदरीत जगण्याच्या पध्दतीत दिसून येते.असे असले तरी सांस्कृतिक अंतःप्रवाह मात्र समान आहे. भावभावना, संवेदना, निसर्गाशी तन्मयता, सामाजिक प्रवृत्ती, समूहजीवनाची ओढ, जन्म, मृत्यू, विवाह, सणवार साजरे करण्याच्या सामान्य पध्दती, धरतीमाता व निसर्ग याबद्दल ऋणाची भावना ही सर्वांच्या लोकसाहित्यात समान आहे.

एकाच भारतीय संस्कृतीचे व निरागस मनाचे विभागानुसार झालेले हे वेगवेगळेआविष्कार म्हणजेच लोकसाहित्यातील सांस्कृतिक विविधता आहे.लोकगीतांमधून प्रतीत होणारी लोकसंस्कृती आहे.

संदर्भपुस्तके

१. महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य - डॉ. सौ. शैलजा देवगांवकर
२. लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास - शरद व्यवहारे
३. आदिवासी विश्व - डॉ. सौ. शैलजा देवगांवकर, डॉ. श. गो. देवगांवकर
४. लोकसाहित्य - य.च.म.मु. विद्यापीठ नाशिक
५. मराठीतील स्त्रीधन - डॉ. सरोजिनी बाबर

Journal of Research & Development
Vol. 5 (Issue 05), September-October, 2015
(ISSN-2230-9578)

अमरावती विभागातील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपणीच्या औद्योगीक ग्राहकांचा विज वापर एक दृष्टीक्षेप

डॉ. एस. पी. जाधव
पदव्युत्तर वाणिज्य विभाग प्रमुख
आर. ए. आर्टस, श्री. एम. के. कॉमर्स & श्री. एस. आर. राठी सायन्स कॉलेज वाशिम, ता. जि. वाशिम
प्रा. जी. इ. बळी (संशोधक विद्यार्थी)

महाराष्ट्र राज्य हे देशात लोकसंख्येच्या मानाने दुसऱ्या क्रमाकावर आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकासात अग्रेसर असुन देशात औद्योगिक विकासाचा द्विपस्तंभ म्हणून ओळखले जाते. राज्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मुलभुत विकास होणे महत्वाचे आहे. उर्जा हे मुलभुत सुविधेमध्ये अतिशय महत्वाचे आहे. उर्जा क्षेत्राच्या प्रगतीचा आर्थिक विकासावर एक परिणाम होतो. १९९१ मधील नविन आर्थिक धोरणानंतर सर्व क्षेत्रात स्पर्धा सुरु झाली उत्पादनाच्या एकूण किमतीत त्यासाठी लागणाऱ्या उर्जेची किंमत समाविष्ट असते व त्यामुळे उद्यागाने स्पर्धेत टिकण्यासाठी उर्जेची गुणवत्ता व किंमत अतिशय महत्वाची ठरते. तसेच सर्व नागरीकांच्या दृष्टीने देखील त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी ती महत्वाची आहे. सामाजिक व आर्थिक विकासाचा आधारस्तंभ आहे. विजेचे योगदान केवळ उद्योग व कृषी क्षेत्रात महत्वाचे आहे. असे नसून मानवी जीवन शैली सुधारण्यासाठी देखिल वीज ही मोलाची मदत करते.

ग्राहकाची संकल्पना व व्याख्या:

बाजारातील सर्वात महत्वाचा घटक ग्राहक आहे. ग्राहकांच्या भोवतालीच सर्व बाजारातील घटक फिरत असतात. ग्राहक हाच सर्व आर्थिक घडामोडी ठरविणारा महत्वाचा घटक आहे. हे लक्षात घेवुनच भारत सरकारने ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी ग्राहक संरक्षण कायदा १९८६ स्थापन केला आहे. याच कायद्याने ग्राहक कोणाला म्हणावे याबद्दल स्पष्ट संज्ञा दिलेल्या आहेत.

अर्थ व व्याख्या: ग्राहक संरक्षण कायदा १९८६ मधील कलम २ (१) (ड) नुसार ग्राहकांची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.

" ग्राहक म्हणजे अशी व्यक्ती की जी मोबदला पूर्णत: किंवा अंशत: देवून वस्तू व सेवा विकत घेते व विक्रेत्याच्या सम्मतीने त्याचा वापर (उपभोग) करण्यात येतो, अशी व्यक्ती ग्राहक होय."

पून्हा विक्री करण्याच्या उद्देशाने खरेदी केलेल्या वस्तुंचा मालक हा ग्राहक होवू शकत नाही. वस्तु किंवा सेवा किंवा दोन्हीही जेंव्हा स्वत: वापरण्यासाठी खरेदी केल्या जातात. त्याचा उपभोग घेण्यासाठी खरेदी केल्या जातात अशा व्यक्तीलाच ग्राहक असे म्हणतात.

जो ग्राहक विजेचा वापर आपल्या उद्योगाकरीता करीत असतो तो औद्योगीक ग्राहक होय. औद्योगीक ग्राहक हा लहान-मोठया यंत्रसमुहाचा वापर करुन उद्योग करीत असतो.

(अ) जिल्हा निहाय औद्योगिक ग्राहकांची संख्या :

वर्ष २००१ ते २०१० मध्ये पश्चिम विदर्भातील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (म.रा.वि.वि.कं.मर्या) चे बुलढाणा, यवतमाळ, अमरावती, अकोला व वाशीम जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांची संख्या खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली आहे. अकोला व वाशीम जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांची संख्या एकत्र दर्शविण्यात आलेला आहे.

जिल्हा निहाय औद्योगिक ग्राहकांची संख्या दर्शविणारा तक्ता

वर्ष	बुलढाणा	यवतमाळ	अमरावती	अकोला व वाशीम	एकूण (१००%)
२००१	२५११ (१८%)	३३४९ (२४%)	४३२५ (३१%)	३७६७ (२७%)	१३९५२
२००२	२५२१ (१८%)	३४०६ (२४%)	४४८३ (३१%)	३९०८ (२७%)	१४३१८
२००३	३८१५ (२२%)	३९१८ (२३%)	४८७१ (२८%)	४६४८ (२७%)	१७२५२
२००४	३८९३ (२४%)	३७२२ (२३%)	४९१८ (३०%)	३७७५ (२३%)	१६३०८
२००५	३९७२ (२२%)	४०५१ (२३%)	५०३६ (२८%)	४७९३ (२७%)	१७८५२
२००६	४०३४ (२२%)	४०८५ (२३%)	५०५२ (२८%)	४८३७ (२७%)	१८०१८
२००७	३७८७ (२२%)	४१२६ (२३%)	५०८७ (२८%)	४८९० (२७%)	१७८९०
२००८	४६०७ (२४%)	४४८५ (२३%)	५३०७ (२७%)	५१६७ (२६%)	१९५६६
२००९	४६४८ (२३%)	४६८१ (२४%)	५३१९ (२७%)	५२७० (२६%)	१९९१८
२०१०	४५४९ (२३%)	४८४३ (२५%)	५१७८ (२६%)	५०३६ (२६%)	१९६०६

(स्त्रोत : म.रा.वि.महामंडळ व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. डीटेल रीपोर्ट व माहिती तंत्रज्ञान केंद्र अमरावती विभाग अकोला वर्ष २००१ ते २०१०)

औद्योगिक ग्राहकांची संख्या दर्शविणारा आलेख.



वरील तक्ता आणि आलेखामध्ये अमरावती विभागाअंतर्गत असणाऱ्या ग्राहकांची संख्या जिल्हानिहाय दिलेली आहे. औदयोगिक ग्राहकामध्ये २००१ पासुन २०१० पर्यंत ग्राहकांचा समावेश आहे. त्यामध्ये बुलढाणा, यवतमाळ, अमरावती, अकोला व वाशीम यांचा समावेश आहे. वरील तक्त्यामध्ये अकोला व वाशीम जिल्हयातील औद्योगीक ग्राहकांची संख्या एकत्रीत दर्शविण्यात आलेली आहे.

वर्ष २००१ ते २०१० या कालखंडातील अमरावती विभागातील औद्योगीक ग्राहकांची संख्या अनुक्रमे १३९५२, १४३१८, १७२५२, १६३०८, १७८५२, १८०१८, १७८९०, १९५६६, १९९१८ व १९६०६ एवढी असल्याचे दिसुन येते.

(ब) जिल्हा निहाय औद्योगिक ग्राहकांचा विद्युत वापर :

वर्ष २००१ ते २०१० मध्ये पश्चिम विदर्भातील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (म.रा.वि.वि.कं.मर्या) चे बुलढाणा, यवतमाळ, अमरावती, अकोला व वाशीम जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांची संख्या खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली आहे. अकोला व वाशीम जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांची संख्या एकत्र दर्शविण्यात आलेला आहे.

जिल्हा निहाय औद्योगिक ग्राहकांचा विद्युत वापर दर्शविणारा तक्ता.

वर्ष	बुलढाणा	यवतमाळ	अमरावती	अकोला व वाशीम	एकूण (१००%)
२००१	२७१२०६८ (२०%)	२३०५२५८ (१७%)	३६६१२९२ (२७%)	४८८१७२२ (३६%)	१३५६०३४०
२००२	३१२९७६३ (२२%)	२४८२११४ (१७%)	३४८९६०७ (२५%)	५०७८४६८ (३६%)	१४१७९९५२
२००३	२५०५६५९ (१८%)	२१००७९३ (१५%)	४२०७९९५ (३०%)	५१८३३१० (३७%)	१३९९७७५७
२००४	३१०४९०० (२०%)	२३१५७६७ (१५%)	४७४५५४७ (३१%)	५१३७०२६ (३४%)	१५३०३२४०
२००५	३००८१४८ (१९%)	२३७४८५४ (१५%)	४९०८०३२ (३१%)	५५४१३२६ (३५%)	१५८३२३६०
२००६	३१२०००० (१९%)	२५६५००० (१५%)	५०३२००० (३१%)	५७७०००० (३५%)	१६४८७०००
२००७	३५३००५९ (२१%)	३००७६६२ (१८%)	४८६३०९४ (३०%)	५०४५०१४ (३१%)	१६४४५८२९
२००८	३७४९७६० (१९%)	२९०२७७६ (१५%)	५७५२५०९ (३०%)	७०६४०३२ (३६%)	१९४६९०७७
२००९	३५१९६७० (२०%)	२८५०३०१ (१६%)	४८८९०३३ (२८%)	६३८८१५९ (३६%)	१७६४७१६३
२०१०	३८१९०५६ (२१%)	२५०४५४५ (१४%)	५२१६९६१ (२९%)	६५३१६५१ (३६%)	१८०७२२१३

(स्त्रोत : म.रा.वि.महामंडळ व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या डीटेल रीपोर्ट व माहिती तंत्रज्ञान केंद्र अमरावती विभाग अकोला वर्ष २००१ ते २०१०)

जिल्हा निहाय औद्योगिक ग्राहकांचा विद्युत वापर दर्शविणारा आलेख.



वरील तक्ता आणि आलेखावरून हे स्पष्ट होते की पश्चिम विदर्भातील महाराष्ट्र राज्य विद्युत महांमडळाच्या (म.रा.वि.वि.कं. मर्या) औद्योगीक ग्राहकांनी किती विद्युत वापरली. विद्युत वापर हा वर्ष २००१ ते २०१० या कालाखंडातील दिलेली असुन तो जिल्हानिहाय दिलेला आहे. तसेच अकोला व वाशीम जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांचा विद्युत वापर एकत्रीत दर्शविण्यात आलेला आहे.

वरील तक्ता व सारणी वरुन हे स्पष्ट होते, की वर्ष २००१ मध्ये बुलढाणा जिल्हयात औद्योगिक ग्राहकांचा विद्युत वापर हा २०% इतका होता. तर यवतमाळ जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांनी त्यांच्या उद्योगासाठी १७% विद्युत वापरल्याचे स्पष्ट होते. तसेच अमरावती विभागात वर्ष २००१ मध्ये २७% विद्युत वापरण्यात आली. तर अकोला व वाशीम जिल्हयात ३६% विद्युत वापर झाल्याचे स्पष्ट होते. वर्ष २००१ मध्ये सर्वाधिक विद्युत वापर हा अकोला व वाशीम जिल्हयात झाल्याचे स्पष्ट होते. तर सर्वात कमी औद्योगिक विद्युत वापर हा यवतमाळ जिल्हयात झाला.

वर्ष २००२ मध्ये बुलढाणा जिल्हयातील विद्युत वापर हा २२% एवढा झाला, तर यवतमाळ जिल्हयातील विद्युत वापर हा १७ % एवढा होता. तसेच अमरावती जिल्हयातील विद्युत वापर हा २५% असल्यास चे स्पष्ट होते. तर अकोला व वाशीम जिल्हयातील विद्युत वापर हा पुर्वीइतकाच परंतु सर्वात जास्त ३६% असल्याचे स्पष्ट होते.

वर्ष २००३ मध्ये बुलढाणा जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांचा विद्युत वापर हा १८% असल्याचे स्पष्ट होते. तर यवतमाळ जिल्हयातील ग्राहकांचा विद्युत वापर हा १५ % असल्याचे स्पष्ट होते. तर अमरावती जिल्हयातील विद्युत वापर हा ३०% असल्याचे स्पष्ट होते. तर अकोला व वाशीम जिल्हयातील विद्युत वापर हा ३७% असल्याचे स्पष्ट होते. वर्ष २००३ मध्ये सर्वाधिक औद्योगिक विद्युत वापर हा अकोला व वाशीम जिल्हयात झाल्याचे स्पष्ट होते. तर सर्वात कमी औद्योगिक विद्युत वापर हा यवतमाळ जिल्हयात झाल्याचे स्पष्ट होते.

वर्ष २००४ मध्ये बुलढाणा जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांनी २०% विद्युत वापरे केल्याचे स्पष्ट होते. तर यवतमाळ जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांनी १५% विद्युत वापर हे केल्याचे स्पष्ट होते. तर अमरावती जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांनी ३१% विद्युत वापर हे केल्याचे स्पष्ट होते. तर अकोला व वाशीम जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांनी ३४% विद्युत वापर हे केल्याचे स्पष्ट होते. सर्वाधिक औद्योगिक विद्युत वापर वर्ष २००४ मध्ये हा अकोला व वाशीम जिल्हयात झाल्याचे स्पष्ट होते.

वर्ष २००५ मध्ये बुलढाणा जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांनी १९% विद्युत वापर हे केल्याचे स्पष्ट होते. तर यवतमाळ

जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांनी १५% विद्युत वापर हे केल्याचे स्पष्ट होते. तर अमरावती जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांनी ३१% विद्युत वापर केल्याचे स्पष्ट होते. तर अकोला व वाशीम जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांनी ३५% विद्युत वापर केल्याचे स्पष्ट होते. वर्ष २००५ मध्ये सर्वाधिक औद्योगिक विद्युत वापर हा ३५% अकोला व वाशीम जिल्हयात झाल्याचे स्पष्ट होते.

वर्ष २००६ मध्ये बुलढाणा जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांचा विद्युत वापर हा १९% असल्याचे स्पष्ट होते. तर यवतमाळ जिल्हयातील ग्राहकांचा विद्युत वापर हा १५ % असल्याचे स्पष्ट होते. तर अमरावती जिल्हयातील विद्युत वापर हा ३१% असल्याचे स्पष्ट होते. तर अकोला व वाशीम जिल्हयातील विद्युत वापर हा ३५% असल्याचे स्पष्ट होते. वर्ष २००६ मध्ये सर्वाधिक विद्युत वापर हा अकोला व वाशीम जिल्हयात झाल्याचे स्पष्ट होते.

वर्ष २००७ मध्ये बुलढाणा जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांनी २१% विद्युत वापरल्याचे स्पष्ट होते. तर यवतमाळजिल्हयातील औद्योगिक ग्राहकांनी १८% विद्युत वापरल्याचे स्पष्ट होते. तर अमरावती जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांनी ३०% विद्युत वापरल्याचे स्पष्ट होते. तर अकोला व वाशीम जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांनी ३१% विद्युत वापरल्याचे स्पष्ट होते. वर्ष २००७ मध्ये सर्वाधिक औद्योगिक विद्युत वापर हा अकोला व वाशीम जिल्हयात झाल्याचे स्पष्ट होते.

वर्ष २००८ मध्ये बुलढाणा जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांचा विद्युत वापर हा १९% असल्याचे स्पष्ट होते. तर यवतमाळ जिल्हयातील ग्राहकांचा विद्युत वापर हा १५ % असल्याचे स्पष्ट होते. तर अमरावती जिल्हयातील विद्युत वापर हा ३०% असल्याचे स्पष्ट होते. तर अकोला व वाशीम जिल्हयातील विद्युत वापर हा ३६% असल्याचे स्पष्ट होते. वर्ष २००८ मध्ये सर्वाधिक औद्योगिक विद्युत वापर हा अकोला व वाशीम जिल्हयात झाल्याचे स्पष्ट होते.

वर्ष २००९ मध्ये बुलढाणा जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांचा विद्युत वापर हा २०% असल्याचे स्पष्ट होते. तर यवतमाळ जिल्हयातील ग्राहकांचा विद्युत वापर हा १६ % असल्याचे स्पष्ट होते. तर अमरावती जिल्हयातील विद्युत वापर हा २८% असल्याचे स्पष्ट होते. तर अकोला व वाशीम जिल्हयातील विद्युत वापर हा मागच्या वर्षी इतकाच ३६% असल्याचे स्पष्ट होते. वर्ष २००९ मध्ये सर्वाधिक औद्योगिक विद्युत वापर हा अकोला व वाशीम जिल्हयात झाल्याचे स्पष्ट होते.

वर्ष २०१० मध्ये बुलढाणा जिल्हयातील औद्योगिक ग्राहकांचा विद्युत वापर हा २१% असल्याचे स्पष्ट होते. तर यवतमाळ जिल्हयातील ग्राहकांचा विद्युत वापर हा १४% असल्याचे स्पष्ट होते. तर अमरावती जिल्हयातील विद्युत वापर हा २९% असल्याचे स्पष्ट होते. तर अकोला व वाशीम जिल्हयातील विद्युत वापर हा मागच्या वर्षा इतकाच ३६% असल्याचे स्पष्ट होते. वर्ष २०१० मध्ये सर्वाधिक औद्योगिक विद्युत वापर हा अकोला व वाशीम जिल्हयात झाल्याचे स्पष्ट होते.

सारांश :

अमरावती विभागामध्ये वर्ष २००१ मध्ये जेव्हा एकूण औद्योगीक ग्राहक १३९५२ होते. तर २०१० मध्ये १९६०६ इतके झाले. वर्ष २००४ व २०१० मध्ये एकूण ग्राहकांच्या संख्येत घट झाल्याचे स्पष्ट होते. पश्चिम विदर्भातील औद्योगिक विद्युत वापराच्या बाबतीत अकोला व वाशीम जिल्हा अग्रेसर असल्याचे स्पष्ट होते. तर यवतमाळ जिल्हयात औद्योगिक विद्युत वापर हा सर्वात कमी होत असल्याचे स्पष्ट होते. तसेच पश्चिम विदर्भामध्ये विद्युत वापर (युनिट) लाखांमध्ये वाढला आहे.

संदर्भ :

(१) म.रा.वि.महामंडळ व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. डीटेल रीपोर्ट व माहिती तंत्रज्ञान केंद्र अमरावती विभाग अकोला वर्ष २००१ ते २०१०

(२) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन - सुरेश राजमाने (पाटील), निकीता पब्लीकेशन लातुर

(३) ग्राहक माहिती पुस्तिका- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

Journal of Research & Development
Vol. 5 (Issue 05), September-October, 2015
(ISSN-2230-9578)

ध.ना.विद्यालयातील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांच्या पत्रलेखनातील चुकांचा अभ्यास

प्रा. डॉ. साहेबराव त्र्यंबकराव भुकन
साने गुरूजी विद्याप्रबोधिनी, सर्वसमावेशक शिक्षणशास्त्र महाविद्यालय खिरोदा ता.रावेर जि.जळगाव

प्रास्ताविक -

आपल्या बालकावर नेहमी चांगलेच संस्कार व्हावेत यासाठी सर्व पालकांची प्रचंड धडपड चाललेली असते.त्यादृष्टीने त्यांने नेहमी चांगले बोलावे,चांगले वाचावे,चांगले पहावे असे सर्व पालकांचे प्रयत्न चालू असतात. शिक्षण म्हणजे संस्कार,शिक्षणातून देखील उत्तमोत्तम ,संस्कार घडावेत अशीच अपेक्षा असते.शालेय जीवनात जर उत्तमरितीने पायाभरणी झालेली असेल तरभावी आयुष्याची इमारत उत्तमरितीने उभी राहण्यास मदत होते.त्यामुळे चांगले वाचन,श्रवण,भाषण आणि लेखन या भाषिक कौशल्यांचा विकास शालेय जीवनात होणे आवश्यक असते.मुलांचे जीवन घडण्यामध्ये औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाचा महत्त्वाचा वाटा असतो, हे सर्वमान्य आहे.त्यामुळे श्रवण ,भाषण,लेखन आणि वाचन या मूलभूत कौशल्यांच्या विकसनासाठी अभिव्यक्तीला अनन्यसाधारण महत्त्व असते.सामान्यतः ही अभिव्यक्ती भाषण आणि लेखन या दोन साधनांद्वारे उत्तम प्रकारे साधली जाते.

"सामान्यपणे लेखन म्हणजे लिहिणे,विशिष्ट वर्ण लिहिणे असा होतो,आपली लिपी ज्या शब्दांनी बनलेली आहे,त्या चिन्हांचा म्हणजे बाराखडी व व्यंजने यांचा वापर करून लिहिणे.सुलेखन आणि शुद्धलेखन असे दोन चांगल्या लेखनांचे दोन विशेष आहेत.हस्ताक्षर सुवाच्च व वळणदार असावे त्याचपर्णाणे मराठी व्याकरणांच्या शुद्धलेखन नियमानुसार असले पाहिजे.या दोन्ही गोष्टी लेखनाच्या बहिरंगांशी निगडीत आहेत.लिहिणाऱ्याच्या भावना,विचार विविध लेखन प्रकारातून व्यक्त झाल्या पाहिजे.याला लेखनाचे अंतरंग म्हणतात. हा लेखनाचा प्राण आहे.लेखन कौशल्याचा विकास या मध्ये यादोन्ही अंगांचा विकास अपेक्षित आहे."(२००५).लेखन कौशल्य ही भाषिक विकासातील उच्चत्तम अवस्था मानली जाते.श्रवण ,भाषण ,वाचन, आणि लेखन या क्षेत्रातील सर्व क्षमतांचा विकास झाल्याशिवाय लेखनाकडे वळणे अशास्त्रीय मानले जाते, ते यामुळेच. भाषणाप्रमाणेच लेखन देखील आत्माविष्काराचे आणि आत्मविकासाचे एक महत्त्वाचे साधन आहे,म्हणून ह्या साधनाचा प्रभावी आणि परिणामकारक रीतीने वापरण्याची क्षमता विकसित करणे गरजेचे आहे.

पत्रलेखन हे एक म्हटले तर तंत्र आहे आणि म्हटले तर कला आहे. हे तंत्र,कला आत्मसात करावी लागते.आजच्या वैज्ञानिक युगात,धकाधकीच्या युगात सर्वांजवळ वेळ खूप कमी आहे,त्यात दिवसेंदिवस मानवी जीवनाची गुंतागुंत वाढत आहे, यासर्वांचा परिपाक म्हणजे वाचनाकडे होत जाणारे मानवाचे अक्षम्य दुर्लक्ष होय.जर चांगले बोलायचे असेल ,लेखन करायचे असेल तर चांगले ऐकले आणि वाचले पाहिजे.त्याअभावी आपल्या विचारांची ,भावनांची अभिव्यक्ती प्रभावी रीतीने,परिणामकारकतेने करताच येणार नाही.त्यामुळे उत्तम प्रकारे पत्रलेखन विद्यार्थी करू शकत नाहीत.आता तर भ्रमणध्वनी,एस.एम.एस.चा काळ आहे.त्यामुळे पत्रलेखनात विद्यार्थी अनेकविध प्रकारच्या चूका करतात,विद्यार्थ्यांना त्यांच्या होणाऱ्या चूका योग्यवेळी लक्षात आणून दिल्या,त्या दुरूस्त केल्या तर त्यांची अभिव्यक्ती क्षमता विकसित होण्यास खचितच मदत होईल . त्यास्तव प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या लेखन क्षमतेचा विकास कितपत झालेला आहे हे अभ्यासण्याचा प्रयत्न केलेला आहे.

शीर्षक – ध.ना.विद्यालयातील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांच्या पत्रलेखनातील चुकांचा अभ्यास

समस्या विधान – ध.ना.विद्यालयातील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांच्या पत्रलेखनातील चुकांचा अभ्यास करणे.

पारिभाषिक शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या –

ध.ना.विद्यालय – खिरोदा येथील धनाजी नाना विद्यालय

इयत्ता सातवीचे विद्यार्थी - उच्च प्राथमिक स्तरावर इयत्ता सातवीच्या पाठ्यक्रमाचे अध्ययन करणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी.

पत्रलेखन – निरोप,विचार आदानप्रदान करण्याचे एक लेखी साधन.

चूका – पत्र लेखनातील तांत्रिक बाबींमध्ये आणि शुद्धलेखनामध्ये होणाऱ्या चूका.

अभ्यास – कोणत्या चूका किती प्रमाणात झालेल्या आहेत त्यांच्या प्रमाणाचा शोध.

संशोधनाची उद्दिष्ट्ये –

१) खिरोदा येथील धनाजी नाना विद्यालयातील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठीच्या कौटुंबिक पत्रलेखनातील चुकांचा शोध घेणे.

२) खिरोदा येथील धनाजी नाना विद्यालयातील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठीच्या कौटुंबिक पत्रलेखनातील चुकांचे वर्गीकरण करणे.

संशोधनाची व्याप्ती –

संशोधनाची व्याप्ती म्हणजे संशोधनाचा आवाका.प्रस्तुत संशोधनासाठी खिरोदा येथील धनाजी नाना विद्यालयातील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांची निवड केलेली आहे.तसेच विद्यार्थ्यांकडून फक्त कौटुंबिक पत्रलेखन करवून घेतलेले आहे.म्हणून ही प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती आहे.

संशोधनाची मर्यादा –

संशोधन समस्येचा आवाका खूप मोठा असेल तर संशोधकाने समस्येची मर्यादा विचारात घेणे आवश्यक असते.त्यामुळे संशोधनाची दिशा नेमकी,स्पष्ट होण्यास मदत होते. प्रस्तुत संशोधनासाठी खिरोदा येथील धनाजी नाना विद्यालयातील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांची निवड केलेली आहे.तसेच विद्यार्थ्यांकडून फक्त कौटुंबिक पत्रलेखन.म्हणून ही प्रस्तुत संशोधनाची मर्यादा आहे.

संशोधनाचे महत्त्व –

मराठी मातृभाषेचे संरक्षण आणि संवर्धन करणे हे प्रत्येक मराठी माणसाचे आद्य कर्तव्य आहे.परंतु मातृभाषा शिकण्याची आवश्यकता नाही असा एक गैरसमज प्रचलित होत आहे.त्यामुळे मराठी भाषेच्या अध्ययनाकडे पुरेशा गांभीर्याने पाहिले जात नाही.त्याचा परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांना निबंधलेखन ,पत्रलेखन यासारख्या लेखन प्रकारात कमी गुण मिळतात,त्यांची आकलन पातळी अजमवता येत नाही,त्यांनी कितपत आकलन केलेले आहे हे पाहण्यासाठी लेखन आवश्यक आहे.म्हणून प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व आहे.

संशोधनाची गरज –

आजच्या संगणक,मोबाईलच्या युगात पत्रलेखनाची आवश्यकता नाही अशी बऱ्याच लोकांची धारणा असलेली आढळते.त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष होते,जीवनात अनेक प्रसंगी पत्रलेखन करावे लागते,रजा मागणे,अर्ज करणे,निरोप देणे यासारख्या प्रसंगी लेखन करावेच लागते.विद्यार्थी घोकंपट्टी करतात,परीक्षेत घोकलेले ओकतात त्यामुळे त्यांची तारांबळ होते .त्यांना व्यवस्थित लेखन करता येत नाही,त्यांच्या पत्रलेखनात अनेकविध चूका होतात,त्याचुकांचे प्रमाण शोधण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

संशोधनाची कार्यपद्धती –

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीची निवड केलेली असून निवडलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना कौटुंबिक पत्र लिहिण्यास दिले आणि प्रत्येक विद्यार्थ्यांच्या स्वतःचा पत्ता,दिनांक,मायना,मुख्य मजकूर,समारोप,ज्याला पत्र पाठवायचे आहे त्याचा पत्ता,स्वतःची स्वाक्षरी ,स्वतःचा पत्ता यासारख्या बाबींमध्ये किती प्रमाणात चूका झाल्या

त्यांचे वर्गीकरण केले.त्यानंतर त्याच्या अर्थाविष्कारासाठी सांख्यिकीय तंत्राचा अवलंब करून सारणीकरण केले. त्याआधारे निष्कर्षांची मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

निष्कर्ष –

१. खिरोदा येथील धनाजी नाना विद्यालयातील इयत्ता सातवीच्या ७५.९३टक्के विद्यार्थ्यांना आणि ७६.६४ टक्के विद्यार्थिनींना पत्र लेखन करताना पत्ता व दिनांक लिहिता आली नाही.

२. खिरोदा येथील धनाजी नाना विद्यालयातील इयत्ता सातवीच्या ३९ टक्के विद्यार्थ्यांना आणि ३६ टक्के विद्यार्थिनींना पत्र लेखन करताना मायना लिहिता आला नाही.

३. खिरोदा येथील धनाजी नाना विद्यालयातील इयत्ता सातवीच्या ४६.५२टक्के विद्यार्थ्यांना आणि ४५.६८ टक्के विद्यार्थिनींना पत्र लेखन करताना मुख्य मजकूर लिहिता आला नाही.

४. खिरोदा येथील धनाजी नाना विद्यालयातील इयत्ता सातवीच्या ५८.८८टक्के विद्यार्थ्यांना आणि ५५.८३ टक्के विद्यार्थिनींना पत्र लेखन करताना समारोप आणि स्वाक्षरी लिहिता आली नाही.

५. खिरोदा येथील धनाजी नाना विद्यालयातील इयत्ता सातवीच्या ८७ टक्के विद्यार्थ्यांना आणि ८४ टक्के विद्यार्थिनींना पत्र लेखन करताना प्रति चा पत्ता आणि पिनकोड लिहिता आला नाही.

संदर्भ

वाळींबे,मो.रा.(१९९०).सुगम मराठी व्याकरण लेखन.पुणेःनितीन प्रकाशन.

सावंत,देसाई,भावळणकर(२००६).प्रथम भाषा,प्रादेशिक भाषा,पुणेःसुविचार प्रकाशन मंडळ.

Journal of Research & Development
Vol. 5 (Issue 05), September-October, 2015
(ISSN-2230-9578)

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या नकाशावाचनाचा अभ्यास

प्रा. प्रतिभा दीपक सूर्यवंशी
साने गुरुजी विद्याप्रबोधिनी सर्वसमावेशक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, खिरोदा

प्रास्ताविक-शिक्षण ही वर्तमानकालीन व भविष्यकालीन महत्त्वाची गुंतवणूक आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट मानले जाते त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.

शालेय विषय दोन प्रकारचे असतात

कौशल्य विषय — ज्ञान विषय

चित्रकला, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण — मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, गाणित

भूगोल या विषयात भौगोलिक परिस्थितीविषयी माहिती अभ्यासक्रमात समाविष्ट केलेली असते. भूगोल विषय प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, महाविद्यालयीन स्तरावर समावेश आहे. विद्यार्थ्यांना पर्यावरण, भौगोलिक ज्ञान व्हावे यासाठी भूगोल विषयाचा समावेशक शालेय शिक्षणात करण्यात आलेला आहे.भूगोलाचे ज्ञान विश्वव्यापक असून विद्यार्थ्यांन मध्ये निरीक्षण, स्मरण, कल्पना व विचारशक्तीचा विकास त्यातून होतो.

संशोधनाची गरज-

व्यक्तिचा व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण होय. आजच्या २१ व्या शतकातील शिक्षण हे आनंददायी शिक्षण होय. पूर्व प्राथमिक शिक्षणापासून इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल या विषयांच्या अध्ययन अध्यापनात विद्यार्थ्यांच्या कृतिशिलतेस वाव मिळणे आवश्यक आहे. भूगोल विषयाच्या संदर्भात अध्ययन चिरकाल व व्यवहारज्ञानाशी सुसंगत व्हावे, भविष्यात त्याचा उपयोग व्हावा यादृष्टीने नकाशावाचन ही समस्या निवडली.

समस्येचे महत्त्व-

भूगोल विषयात नकाशाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे म्हणूनच नकाशावाचन विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरते. विद्यार्थ्यांच्या नकाशावाचनातील अडचणी दूर केल्यास नकाशावाचन सोपे होइल व भूगोल विशयाची आवड निर्माण होईल. भावी जीवनात नकाशाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भूगोलाच्या नकाशामुळे देश, समूद्र, स्थान विस्तार, हवामान, खनिा संपत्ती, पर्यटन व्यवसाय, लघु व्यवसाय, यासर्वांचे ज्ञान नकाशामुळे मिळू शकते.

समस्या विधान- कुसुमताई माध्यमिक विद्यालय, फैपूर येथील आठवीतीस विद्यार्थ्यांच्या नकाशावाचनाच अभ्यास करुन नकाशावाचन कौशल्य विकसनासाठी उपाययोजना करणे आणि परिणामकराकता अभ्यासणे.

संशोधनातील कार्यात्मक व्याख्या-

विद्यार्थी- जळगाव जिल्ह्यातील यावल तालुक्यातील कुसुमताई माध्यमिक विद्यालय, फैजपूर शाळेतील इयत्ता ८ वीत शिकणारे मराठी माध्यमाचे फक्त ३० विद्यार्थी

नकाशावाचन- पृथ्वीवरील कोणत्याही ठिकाणाचे सपाट पृष्ठभागावर काठलेले चित्र म्हणजे नकाशा त्याचे व्दिमितीय वाचन.

संशोधनाची उद्दिष्टे-

१. नकाशावाचन करताना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे
२. समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना कार्यक्रम तयार करणे
३. विविध प्रकारच्या नकाशांचे वाचन करुन नकाशावाचनाचे तंत्र माहित करुन घेणे

गृहितके-

१.भूगोल विषयाचा इ. ८ वीच्या पाठयक्रम त्या इयत्तेमधील मुलांच्या वयोगटाला अनुरुप आहे.

२.नकाशावाचनासंबंधी माहिती कमी प्रमाणात आहे.

परिकल्पना-

१.विविध उपक्रमांद्वारा सराव दिल्यावर इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांचे नकाशावाचन कौशल्य विकसित होइल

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा-

प्रस्तुत समशोधन हे जळगाव जिल्ह्यातील यावल तालुक्यातील कुसुमताई माध्यमिक विद्यालय, फैजपूर शाळेतील इयत्ता ८ वीत शिकणारे मराठी माध्यमाचे फक्त ३० विद्यार्थ्यापुरते मर्यादित आहे.

अभ्यासक्रमाच्या अनषंगाने इ. ८ वीच्या पाठ्यपुस्तकातील नकाशासाठीच्या प्राथमिक ज्ञानासाठीच संशोधन मर्यादित आहे.

संशोधनाचे वेगळेपण -

संशोधन ही समस्या निराकरणाची सुव्यवस्थित प्रक्रिया आहे शिक्षण क्षेत्रामध्ये अनेक अडचणी व समस्या असतात शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समस्यांचे विश्लेषण करुन त्यांच्या निराकरणाचे मार्ग शोधणे आवश्यक असते.नकाशावाचन संदर्भात इतर संशोधकांनी केलेले संशोधन हे शैक्षणिक संशोधन आहे परंतु कृतिसंशोधन हे पूर्णतः वेगळे आहे.

संशोधनाची कार्यवाही-

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील कार्यवाहीचे टप्पे निश्चित केले

१ पूर्व चाचणी पडताळा सूचीद्वारे मापन



पद्धती-

प्रायोगिक पध्दती

१.नियंत्रित चल इ.८ वी अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, इ.८ वीचे ३० विद्यार्थी, नकाशे

२. स्वतंत्र(प्रायोगिक) चल- नकाशावाचन कौशल्य विकसनाचे विविध कार्यक्रम

अभिकल्प-

इ ८ वीच्या ३० विद्यार्थ्याचा समावेश केला जाइल हा एकल ग़ट अभिकल्प आहे.

न्यादर्श- कुसुमताई माध्यमिक विद्यालय, फैपूर शाळेतील इयत्ता ८ वीतील ३० विद्यार्थी

सहेतूक न्यादर्श

माहिती संकलनाची साधने-

विविध अनुभूती देणारे उपचारात्मक कार्यक्रम

पूर्व चाचणी- अंतिम चाचणी

संख्याशास्त्रीय साधने-

शेकडाप्रमाण

मध्यमान

माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन- प्रस्तुत समस्यांची उत्तरे मिळविण्यासाठी माहितीवर संस्करण करावे लागते हे सेस्करण म्हणजे

माहितीचे वर्गीकरण होय. अर्थनिर्वचनकरुन माहितीचे संकलन व वर्गीकरण पुढीलप्रमाणे

१. विद्यार्थ्यांना नकाशावाचन करतांना येणाऱ्या समस्यांची कारणे शोधली

२. विद्यार्थायंना २०गुणांची चाचणी देउन रंग, चिन्हे, नकाशावरील प्रश्न, स्थान दर्शविणे, पडताळा सूचीवरुन विद्यार्थायंनी सोडविलेली उत्तरे आणि त्यांच्या टुकांचे संकलन व वर्गीकरण केले

३. मिळालेल्या उत्तरांवरुन उपचारात्मक अध्यापना उपक्रमांची निवड केली.

४. साख्यिकीय तुलना

निष्कर्ष-

संशोधनाच्या समस्येनुसार माहितीचे संकलन आणि वर्गीकरण केले पूर्व चाचणी आणि अंतिम चाचणी सांख्यिकीवरुन तुलना करुन पूर्व चाचणीपेक्षा अंतिम चाचणीतील गुण वाढलेले दिसून आले.

१. पूर्वचाचणीपेक्षा अंतिमचाचणीत १००/ नी वाढ झाली.

२. पूर्व चाचणीत ६, २९ या क्रमांकच्या विद्यार्थ्यांना ६ गुण आहेत हे सर्वात कमी गुण आहेत अंतिम चाचणीत या विद्यार्थ्यांच्या गुणात ७५/ वाढ झाली आहे.

३. विद्यार्थी क्र. ४ ला पूर्व चाचणीत २३ गुण आहेत हे सर्वात जास्त गुण मिळविणारा आहे. अंतिम चाचणीत त्याच्या गुणात २० वाढ झाली आहे.

४. विद्यार्थ्यांना नकाशावाचनात सराव दिला तर विद्यार्थ्यात नकाशावाचन कौशल्य वाढते

५. नकाशा वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांचे अध्ययन गती वाढलेली दिसली

शिफारशी-

१. माध्यमिक शाळेत नकाशांची उपलब्धता ठेवावी

२. विद्यार्थ्यांना नकाशात प्रत्येक ठिकाणे दाखविणे, नकाशा आऊटलाइन मध्ये प्रत्यक्ष ठिकाणे दर्शविणे

३. विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिके करुन घेणे.

४. विद्यार्थ्यांची अभिरुची वाढावी यासाठी कृतियुक्त उपक्रम राबवावेत

५. उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे.